# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## अभ्यासपत्रिका – V

# पाश्चात्य साहित्य विचार

## विषय कोड : 86547

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य. डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक व अभ्यास समन्वयक** : **प्रा. बालाजी ग्यानोबा कांबळे**
मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ . प्रा. ज्ञानेश्वर गोविंद मुंढे**
मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ . अंजली आर . मस्करेनहस**
मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **डॉ . प्रतिभा टेंबे**
मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | पाश्चात्त्य साहित्य विचार : साहित्याचे स्वरूप | १ |
| २ | पाश्चात्त्य साहित्य विचार : साहित्याची भाषा | १२ |
| ३ | साहित्याची निर्मितिप्रक्रिया व प्रयोजन विचार | २३ |
| ४ | साहित्याचा आस्वाद | ३१ |

**तृतीय वर्ष कला**

**सत्र - VI (CBCS)**

**अभ्यासपत्रिका – V**

# पाश्यात्य साहित्य विचार

**अभ्यासक्रम**

***उद्दिष्टे (Objective)***

1. *पाश्चात्य साहित्याचे स्वरूप समजावून घेणे*
2. *पाश्चात्य साहित्य विचारात साहित्याच्या भाषेचे स्वरूप समजावून घेणे*
3. *साहित्याची निर्मिती प्रक्रिया व प्रयोजन समजावून घेणे*
4. *साहित्याच्या आस्वादाचे सिद्धांत समजावून घेणे*

**घटक – १ पाश्चात्य साहित्य विचार : साहित्याचे स्वरूप**

१ अनुकृती सिद्धांत : प्लेटो व ॲरिस्टॉटल

२ पाश्चात्यांनी केलेल्या काव्यव्याख्या : वर्डस्वर्थ, कोलरीज. कोर्टहॉप, एडगर अलन पो, अर्नोल्ड.

**घटक -२ पाश्चात्य साहित्य विचार : साहित्याची भाषा**

१. रूपक, प्रतिक व प्रतिमा

२. अनेकार्थता, नियामोल्लंघन, अपरिचीतीकरण.

**घटक -३ पाश्चात्य साहित्य विचार : साहित्याची निर्मिती प्रक्रिया व प्रयोजन विचार**

१ कोलरिजचा कल्पनाशक्तीचा व चमत्कृतीशक्तीचा सिद्धांत.

२ आत्मविष्कार, जीवनभाष्य, सामाजिक बांधिलकी (मार्क्सवादी विचारासह) ही प्रयोजने.

**घटक-४ पाश्चात्य साहित्य विचार : साहित्याचा आस्वाद**

१ ॲरिस्टॉटलच्या कॅथार्सिसचा सिद्धांत.

२ रिचर्ड्सचा प्रेरणा संतुलनाचा सिद्धांत.

## सत्रान्त परीक्षा – गुण १००

प्रश्न १. घटक १ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०

प्रश्न २. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०

प्रश्न ३. घटक ३ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०

प्रश्न ४. घटक ४ वर आधारित प्रश्न (पर्यायासह ) गुण २०

प्रश्न ५. सर्व घटकांवर आधारित दोन टीपा (पर्यायासह ) गुण २०

***साध्ये (Outcome)***

1. *पाश्चात्य साहित्य विचारांचा परिचय होईल*
2. *पाश्चात्य साहित्याच्या निर्मिती प्रक्रिया व प्रयोजन विचाराचा परिचय होईल*
3. *पाश्चात्य साहित्याच्या आस्वाद घेण्याच्या पद्धती समजतील*

**संदर्भ ग्रंथ-**


१ करंदीकर, गो.वि., (भाषांतर) ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र, मौज, मुंबई १९७८

२ नेमाडे भालचंद्र, साहित्याची भाषा, साकेत, औरंगाबाद, १९८७

३ पाटणकर, वसंत, साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या पद्मगंधा, पुणे, २००६.

४ पाटील, गंगाधर, समीक्षेची नवी रूपे, मॅजेस्टीक, मुंबई १९८१

५ मालशे, मिलिंद, आधुनिक, भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन. लोकवाङ् मयगृह, मुंबई. १९९५

६ गणोरकर, प्रभा, डहाके वसंत आबाजी व इतर, (संपा.) वाङ् मयीन संज्ञा संकल्पना कोश, ग.रा. भटकळ फाऊंडेशन, मुंबई, २००१

७ राजाध्यक्ष, विजया व इतर, (संपा.) मराठी वाङ् मयकोश, खंड ४, (समीक्षा संज्ञा), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२

८) पाश्चात्य साहित्यविचार : भालचंद्र खांडेकर, लीला गोविलकर

९) पाश्चात्य साहित्यविचार : प्रा. ब.लु. सोनार

**तृतीय वर्ष बी. ए. सत्र – VI (विषय कोड – ८६५४७)**
**अभ्यासपत्रिका क्र. 5 . 'पाश्यात्य साहित्यविचार'**

**नमूना प्रश्न पत्रिका** गुण 100

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत .

3) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात .

**प्रश्न 1. ) प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी अनुकृती विषयी केलेल्या चर्चेचा परामर्श घ्या.** (20)

किंवा

**वर्ड्स्वर्थ, कोलरिज यांच्या काव्य व्याख्यांची चर्चा करा.**

**प्रश्न 2. साहित्याच्या भाषेतील रुपक , व प्रतिमा यांचे स्वरूप स्पष्ट करा.** (20)

किंवा

**'अनेकार्थता आणि नियमोल्लंघन' या तत्वांच्या साहाय्याने साहित्य भाषेचे विवेचन करा.**

**प्रश्न 3. ' सामाजिक बांधिलकी' हे साहित्याचे एक प्रयोजन आहे',या विधानाची चर्चा करा.** (20)

किंवा

**कोलरिजने मांडलेल्या कल्पनाशक्तीच्या प्रकरांची चर्चा करा.**

**प्रश्न 4. ॲरिस्टॉटलकृत 'कॅथॅर्सिस' ही संकल्पना विशद करून विविध अभ्यासकांनी लावलेल्या अर्थांचा परामर्श घ्या.** (20)

किंवा

**साहित्याचा आस्वाद म्हणजे काय ते सांगून या आस्वादप्रक्रियेतील प्रेरणासंतुलनाचे कार्य विशद करा.**

**प्रश्न 5. खालील पैकी कोणत्याही दोन टिपा लिहा.** (20)

1) प्लेटोने मांडलेला अनुकृतीचा विचार

2) मिल्टनकृत 'कॅथॅर्सिस' संकल्पनेचे विवेचन

3) लौकिक अनुभव व कलानुभवातील भेद

4) साहित्याचे प्रयोजन

# १

# पाश्चात्त्य साहित्य विचार : साहित्याचे स्वरूप

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ अनुकृतीचा सिध्दांत

१.२.१ प्लेटोचा अनुकृतीचा विचार

१.२.२ ॲरिस्टॉटलचा अनुकृतीचा सिध्दांत

१.३ पाश्चात्त्यांनी केलेल्या काव्यव्याख्या.

वर्डस्वर्थ

कोलरिज

कोर्टहॉप

एडगर ॲलन पो

अर्नोल्ड

१.४ समारोप

१.५ संदर्भसूची

१.६ नमुना प्रश्न

## १.० उद्दिष्टे

१) पाश्चात्त्य साहित्यशास्त्राचा विद्यार्थ्यांचा परिचय करून देणे.

२) पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील अनुकृती विचाराचा मागवा घेणे.

३) पाश्चात्त्यांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्यांचा परिचय करून देणे.

४) पाश्चात्त्य साहित्यशास्त्राचे स्वरूप समजून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

साहित्य हा शब्द सर्वसाधारणपणे वेगवेगळ्या संदर्भाने नि अर्थाने वापरल्या जातो. दैनंदिन जीवनात साहित्य या संकल्पनेचा व्यापक पातळीवर अर्थ सामग्री असा घेतला जातो. गृहिणींचे स्वयंपाक घरातील साहित्य, कृषीवलांचे शेतीचे साहित्य, कारागिरांचे साहित्य अशा अर्थाने लौकिक व्यवहारात साहित्य हा शब्द वापरला जातो. येथे साहित्य या शब्दाचा सामग्री

अथवा साधन असा अर्थ अभिप्रेत असतो. वाङमय वा साहित्य या संज्ञा अनेकदा व्यापक अर्थाने वापरल्या जातात. वाङमय म्हणजे सर्व प्रकारचा वाक् व्यवहार. त्यामध्ये दैनंदिन जीवनातील संभाषण, सभा, चर्चासत्रे, व्याख्याने इत्यादींचा समावेश होतो. साहित्य या संज्ञेत जे जे लिहिले किंवा छापले जाते ते ते असा अर्थ घेतला तर पत्रे, वृत्तपत्रे, जाहिराती, वृत्तांत, अहवाल, शास्त्रीय लेखन, ऐतिहासिक लेखन इत्यादींचा त्यात अंतर्भाव होऊ शकतो. मात्र आपणास साहित्य या संज्ञेचा वरील प्रमाणे अर्थ अभिप्रेत नाही. लेखनाच्या संदर्भात हा शब्द एवढ्या सैलपणे अथवा ढोबळ अर्थाने वापरला जात नाही. येथे विशिष्ट स्वरूपाच्या लेखनासाठी हा शब्दप्रयोग होतो. साहित्याला ललित साहित्य, काव्य, वाङमय इत्यादी समानार्थी शब्द वापरला जातात. संस्कृत साहित्यशास्त्रात यासाठी 'काव्य' हा शब्द योजिलेला दिसतो.

प्रा. वा. ल. कुलकर्णी या ख्यातनाम समीक्षकाने साहित्याची प्रकृती स्पष्ट करताना ललित आणि ललितेतर साहित्याचे वेगळे विशेष नेमकेपणाने टिपलेले आहेत. त्यांच्यामते 'ललित साहित्य हे मूलतः व्यक्तिनिष्ठ, भावप्रेरित, कल्पना प्रतिभानिर्मित, सौंदर्यसिद्धीच्या नियमांचे अनुसरण करणारे, वैशिष्ट्यपूर्ण संघटन असणारे आणि ज्यांच्या आशयाची नेमकी अटकळ बांधता येत नाही असे आहे. तर ललितेतर साहित्य हे मूलतः वस्तुनिष्ठ, बुद्धीप्रेरित, तर्क - अनुमानादींवर भर देणारे म्हणून तर्काधिष्ठित सुसंघटन असणारे, अविष्काराबाबत एक ठराविक साचा असणारे आणि ज्यांच्या आशयाची अटकळ बांधता येईल अशी आशयरूपी सिद्धांताची अवस्थांतरे असणारे असे आहे.

राजशेखर या प्राचीन संस्कृत समीक्षकाने साहित्याचे वर्गीकरण करताना 'वस्तूनिबंधन' आणि 'प्रतिभासनिबंधन' असे साहित्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यांच्या मते 'वस्तूनिबंधन' किंवा 'स्वरूपनिबंधन' म्हणजे असे साहित्य की ज्यात वस्तूचे-विषयाचे यथातथ्य, जसेच्या तसे वर्णन केले जाते. वर्ण्य वस्तू व विषय यावरच हे लेखन सर्वतोपरी केंद्रित झालेले असते; अशा लेखनात वाच्यार्थाला किंवा निश्चितार्थाला महत्त्व असते. या उलट 'प्रतिभासनिबंधना' त वस्तूचे जसेच्या तसे वर्णन येत नाही. त्यात कवीच्या चमत्कृतिपूर्ण प्रतीतीचे महत्त्व जास्त असते. तेथे जो दिसतो तो कवीच्या प्रतिभेचा विलास असतो. म्हणून तेथे लक्षात येत जातो तो काव्यार्थ.

पाश्चात्य साहित्य मीमांसेनेही Emotive element आणि Thought element म्हणजे भावनात्मक घटक आणि वैचारिक घटक अशा दोहोंच्या आधारे प्रामुख्याने साहित्याचे वर्गीकरण केले आहे. ते करताना, अर्थातच त्याचे वाचकांच्या मनावर होणारे परिणाम प्रामुख्याने ध्यानी घेतलेले आहेत. याबाबतीत जिथे विचार हाच घटक प्रामुख्याने जाणवतो ते ललितेतर, शास्त्रीय साहित्य आणि जिथे भावना-लालित्य हा घटक प्रामुख्याने जाणवतो ते ललित साहित्य असे म्हटले जाते.

### साहित्याचे शब्दरूप

साहित्य, संगीत, शिल्प, वास्तू, चित्र इत्यादी सर्वच ललित कलाविष्कार म्हणजे कलावंताने आपल्या अनुभवांची प्रतिभा-कल्पना यांच्या आधारे साधलेली पुनर्निर्मिती होय. सौंदर्य हे या सर्वांमागील सामान सूत्र आहे. मात्र अशी पुनर्निर्मिती साधत असताना कलावंत जे मूलद्रव्य

वापरतो त्या मूलद्रव्याच्या स्वरूपामुळे या कलांच्या पुनर्निर्मितीच्या स्वरूपात फरक दिसून येतो. चित्रकार 'रंग' या मूलद्रव्याच्या आधारे आपली कला सादर करतो; तर शिल्पकार प्रस्तराच्या माध्यमातून आपली कल्पना प्रत्यक्षात आणतो. याठिकाणी मूलद्रव्य म्हणजे कलावंत वापरत असलेल्या इंद्रियगोचर वस्तू व प्राथमिक सामग्री होय.  शब्द हे साहित्याचे मूलद्रव्य आहे कवी किंवा लेखक आपल्या अनुभवांची पुनर्निर्मिती शब्दांच्या आधारे साधतांना दिसतो. त्यामुळे 'शब्द' या घटकाला साहित्याच्या विश्वात एक अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले दिसते. अर्थात केवळ शब्दांना शब्द म्हणून साहित्यात स्थान असत नाही. संपूर्ण अभिप्रायाच्या आविष्कारासाठी त्यांचे विशिष्ट भाषेत रूपांतर व्हावे लागते. असे शब्द किंवा भाषा ही रंग, पाषाण या मूलद्रव्यांप्रमाणे जड, बाह्य वस्तू नसून ती मानवाची स्वयंनिर्मिती आहे. असे वेलेक आणि वॉरेन या समीक्षकांनी जे म्हटले आहे ते फारच लक्षणीय आहे. कारण भिन्न मानव समूह, त्यांचा विशिष्ट संस्कृती वारसा आणि त्यांची अशी खास स्वयंनिर्मित भाषा यातील अतूट संबंध साहित्याच्या बाबतीत मोठा परिणामकारक ठरत असतो.

## १.२ अनुकृतीचा सिध्दांत

पाश्चात्त्य साहित्य मीमांसेची परंपरा इसवी सन पूर्व पाचव्या शतकामध्ये सुरू झालेली दिसते. प्रसिद्ध ग्रीक तत्ववेता सॉक्रेटिस याचा शिष्य प्लेटो याने त्याच्या काळात ग्रीसमध्ये रंगभूमीवर सादर होणाऱ्या शोकांतिकांच्या संदर्भात कला विचार मांडला. त्यातून चित्र, संगीत, नाटकातील कलांच्या स्वरूपाविषयीचे सिद्धांत सुरू झाले, या संदर्भात प्लेटोने केलेल्या कलामीमांसेतून अनुकृती सिद्धांताचा उदय झाला. ॲरिस्टॉटलने या सिद्धांताचा विकास केला. पाश्चात्त्य परंपरेत कलेच्या अनुकृतीत्वाला फार महत्त्व प्रथम पासून दिल्याचे आढळते. प्लेटो हा पाश्चात्त्य परंपरेतील पहिला कलामीमांसक होय. त्याने कलेतील अनुकृती विषयी तत्त्वज्ञानाच्या पातळीवरील काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्याचे सत्ताशास्त्रीय, ज्ञानशास्त्रीय व नैतिक असे वर्गीकरण करता येईल.

### १.२.१ प्लेटोचा अनुकृतीचा विचार

ग्रीक तत्ववेत्ता प्लेटो (इ.स.पू. ४२७ ते ३४७) याने अनुकृतीचा सिद्धांत सर्वप्रथम मांडला. प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथात 'आयडियल स्टेट' ची संकल्पना मांडली. आदर्श नागरिकाच्या अंगी शौर्य, संयम, विवेक, न्याय हे गुण असावेत अशी त्याची भूमिका होती. प्लेटोच्या कला-साहित्य विषयक विचारांवर त्याच्या जीवनाकडे पाहण्याचा नैतिकतावादी दृष्टिकोनाचा आणि तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव पडलेला होता. याच संदर्भात त्याने कलांची चिकित्सा केलेली आहे. ज्या कला या उद्दिष्टांची परिपूर्ती करतात त्यांनाच केवळ त्याने आपल्या आदर्श राज्यात स्थान दिले आणि ज्या कलांचा नागरिकांच्या मनावर विपरीत परिणाम होईल असे त्याला वाटले त्या कलांना व कलावंतांना त्याने आपल्या आदर्श राज्यात मज्जाव केला. ग्रीक संस्कृतीमध्ये शौकात्मिकांच्या सादरणीकरणाला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्या नाट्यरूपाने प्रेक्षकांसमोर अभिनित होत असत. या नाटकांचे विषय, अशय व परिणाम लक्षात घेऊन प्लेटोने त्याच्या विषयी एक भूमिका घेतली. त्यातूनच त्याचा अनुकृतीचा सिद्धांत निर्माण झाला.

प्लेटोच्या मते, बुद्धीला केवळ सत्याचा बोध घेता येतो आणि प्रकाशातच मानवी जीवनाची चांगली घडी बसविता येते यावर प्लेटोचा दृढ विश्वास होता. प्लेटोचे तत्वज्ञान सामान्यतः अनुभवजन्य व इंद्रियजन्य ज्ञानाला कमी लेखणारे होते. प्लेटो ईश्वर, अध्यात्म मारणारा तत्वज्ञानी आहे. आयडिया (idea) म्हणजे चिदरूप. हे चिदरूप इंद्रियगोचर नसते. हे चिदरूप इंद्रियेगोचर सृष्टीतील वस्तूच्या आधी अस्तित्वात असते. हे चिदरूप अविकारी, अविनाशी व अपरिवर्तनशील असते. हे चिदरूप केवळ बुद्धीलाच आकळते. नश्वर वस्तूंचे इंद्रियांना जाणवणारे भाग म्हणजे अंतिम सत्य नव्हे. बुद्धीला जाणवणारे त्याचे अविनाशी रूप म्हणजे त्याचे चिदरूप होय. हे चिदरूप म्हणजे अंतिम सत्य होय. प्लेटोच्या या चिदरूपाच्या कल्पनेबरोबरच आत्म्याच्या तीन भागाची कल्पना येथे लक्षात घ्यावी लागते.

- आत्म्याचा पहिला भाग हा अमर, अविनाशी आणि अभेद्य असतो.
- दुसरा भाग विनाशी, विच्छेद्य असतो. शौर्य, संयम अशा गुणांच्या अधिष्ठान या भागात असते.
- तिसरा भागही विनाशी असतो. तो संग्रहशील असतो.

जनावरांमध्ये पहिला विचारशील भाग नसतो. उरलेले दोन भाग मात्र असतात. चिदरूपाची परिणती शिवतत्वात (Good) होते आणि त्याचे आकलन फक्त विचारशील आत्माच करतो. चिदरूपाव्यतिरिक्त उरते हे सर्व असत्य आणि सत्य संशोधनाचा अधिकार कलांना नाही; तर तो आहे तत्वज्ञानाला. प्लेटोच्या तत्त्वज्ञानात कला आणि वाङ्मयाशी विचारशील आत्म्याचा संबंध तुटला आणि आत्म्याचा दुय्यम भागाशी कला आणि वाङ्मयाचा संबंध जोडला गेल्याने कलांना आणि वाङ्मयाला गौणात्व प्राप्त झाले आहे.

प्लेटो म्हणतो की, अंतिम सत्य शाश्वत एकमेव असले पाहिजे. साहित्य या अंतिम सत्या पर्यंत पोहोचू शकत नाही. एवढेच नव्हे तर साहित्यादी कला या अंतिम सत्य पासून दोनदा दूर ढकललेल्या असतात. कशा ते पुढील प्रकारे प्लेटो स्पष्ट करतो.

**१. ईश्वरनिर्मित मूळ सूक्ष्म व आदर्श रूप-**

हे इंद्रियातित आणि पूर्ण आहे. हे चिदरूप म्हणजेच अंतिम सत्य होय. हे इंद्रिय ज्ञानाचा विषय नाही. ते बुद्धीगम्य आहे. उदा. पलंगाचे चिदरूप म्हणजे पलंगा मागची अव्यक्त कल्पना. अनेक विवक्षित पलंगांचे हे वैश्विक (Universal) आणि शाश्वत रूप असते.

२. चिदरूपाची सुतार/लोहार यांनी केलेली अनुकृती म्हणजे विवक्षित पलंग. ही अनुकृती उपयुक्त असते पण ही चिदरूपाची अपूर्ण प्रतिकृती असते.

३. चित्रकार हा सुतार/लोहाराच्या अनुकृतीचे रंगरेषांच्या द्वारा चित्र काढतो. हे चित्र म्हणजे सुताराच्या पलंगाची अनुकृती असते. अंतिम सत्यापासून पलंग आणि चित्र रूपाने - मार्गाने साहित्यादी कला दोनदा दूर गेलेल्या असतात. म्हणून साहित्यादी कलांना त्याने अनुकृतीची अनुकृती (Imitation of Imitation) म्हटले आहे.

अनुकरणात्मक कलांची निर्मिती ही सृष्टी नियमांच्या ज्ञानावर अवलंबून नसते तर ती दैवी प्रेरणांवर अवलंबून असते. दैवी प्रेरणेने कवी जसा आकृष्ट होतो तसे प्लेटोच्या मध्ये सारी

कलासृष्टी देखील आकृष्ट व विक्षिप्त स्वरूपाची बनते. या जगात प्रत्येक गोष्टीमागे माणसे, झाडे यांच्या वर्गाशी संबंध असे अनेक वस्तू जातीचे एक चिदरूप असते. त्याचे अस्तित्व हे वस्तूच्या अस्तित्वावर अवलंबून नसते. प्लेटोच्या या तत्त्वज्ञानात चिदरूपाची एक श्रेणी आहे. वस्तूविषयाची चिदरूपे ही त्याहूनही खालच्या पातळीवरची असतात. प्लेटोच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे पलंगाचे चिदरूप हे अंतिम सत्य आहे. सुताराने बनवलेला पलंग हा चिदरूपाची एक अनुकृती होय. हा पलंग जीवनाला उपयुक्त असल्याने व त्या अनुकृतीच्या साह्याने मूळची चिदरूपाची मनाला जाणीव होत असल्याने सुताराने पलंग निर्माण करणे हितावह आहे. पण सुताराच्या पलंगाची जेव्हा चित्रकार रंगरेषा इत्यादींच्या साह्याने किंवा साहित्यिक शब्द अर्थ या माध्यमातून अनुकृती तयार करतो तेव्हा त्यापैकी कोणतीही गोष्ट साधत नाही. सुतार/लोहाराचा पलंग चिदरूपाची नुसती अनुकृती असते तर चित्रकाराचा पलंग ही त्या अनुकृतीची अनुकृती असते. या न्यायाने प्लेटोने सर्व ललित कलांना अंतिम सत्य पासून दूर ढकलले आणि तत्त्वज्ञानाच्या, सत्यशोधनाच्या क्षेत्रातील आपला अधिकार प्रस्थापित केला.

प्लेटोच्या मते मानसिक स्वास्थ्य किंवा आनंद देणारा प्राणी म्हणून कवी वंदनीय असला तरी त्याला सत्याच्या पलीकडे जाऊन रचना करायची असल्यास या राज्यात त्याला स्थान नाही. त्याने साहित्यावर पुढील प्रमाणे आक्षेप घेतले.

१) साहित्य अनुकरणातून निर्माण झालेले असल्यामुळे ते असत्य असते.

२) साहित्याची निर्मिती अज्ञानातून होते. कारण त्याला खऱ्या सत्याची ओळख नसते.

३) माणसाच्या वासनांतून साहित्य निर्माण होते आणि शूद्र वासनांना जन्म देते त्यामुळे ते समाज घातक आहे.

थोडक्यात प्लेटोने या विचारसरणीत नीतीमूल्यांना सर्वाधिक महत्त्व दिले आहे. चित्रकला आणि कविता या दोन भिन्न गोष्टी असून चित्रकलेत (प्रतिबिंब) स्थितीशीलता व रूपगत साम्य आढळते तर कवितेमध्ये (अनुकृतीत) बदलाला महत्त्व दिले असते. हाच विचार अधिक सखोलपणे ॲरिस्टॉटलने आपल्या सिद्धांतात मांडला आहे.

### **१.२.२ ॲरिस्टॉटलचा अनुकृतीचा सिध्दांत** (इ.स.पूर्व ३८४ ते ३२२)

प्लेटोने साहित्य-कला विषयक मांडलेल्या मतांचा प्रतिवाद करताना Poetics या ग्रंथामध्ये आपले विचार पुढील प्रमाणे मांडले आहे. ॲरिस्टॉटलने आपल्या अनुकृतीच्या सिद्धांतामध्ये अनुकृतीचे माध्यम, अनुकृतीचे विषय आणि अनुकृतीची पद्धती यावर लक्ष केंद्रित करून हे विवेचन केलेले आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, 'अनुकृती म्हणजे हुबेहूब नक्कल नसून ती एक पुनर्निर्मिती आहे.' ही पुनर्निर्मिती संभाव्य वाटावी अशी असली पाहिजे. कलाकार जी निर्मिती करतो तिच्यात आदर्श रूपाचीच जाणीव करून देतो. त्या आदर्श रूपाच्या जाणिवेमुळे वाचकाला आनंद होतो. ही पुनर्निर्मिती एखाद्या व्यक्तीच्या आधारावर केलेली असते (उदा दुष्यंत आणि शकुंतला यांचे चित्रण) या पुनर्निर्मितीपासून मिळणारा आनंद सार्वत्रिक स्वरूपाचा असतो. भारतीय साहित्य विचारातील साधरणीकरणाशी मिळताजुळता हा विचार आहे.

ॲरिस्टॉटलच्या अनुकृती सिद्धांतात ललित कलाकृतींचा विचार प्रामुख्याने आला आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या दोघांनीही अनुकृतीचा सिद्धांत मांडला असला तरी 'माणसाला चिद् रूपापासून काव्य-कला दूर घेऊन जाते. काव्य हे असत्याचे दर्शन घडविते' असा दृष्टिकोन प्लेटोने स्वीकारलेला दिसतो. त्यामुळे तो आपल्या 'आदर्शराज्य' कल्पनेतून कवी-लेखकांची हकालपट्टी करतो परंतु ॲरिस्टॉटलने 'अनुकृती ही वाचकाला (कलावंतालाही) आनंद देणारी आहे कारण ती विशिष्ट वस्तूच्या आभासातून वाचकाला त्या वास्तवाच्या जवळ नेते 'अरे हेच ते' असे वाचकाला जाणवावे इतकी ती प्रत्ययकारी ठरते आणि त्या विशिष्टाला विश्वव्यापी स्वरूपात नेते. ही विश्वात्मकता म्हणजे कलावंतांनी निर्माण केली एक आनंददायी कालाकृती असते. तो जीवनानुभवाचा साक्षात्कार घडवण्याइतकी समृद्ध व संपन्न असते' असे ॲरिस्टॉटलने मत मांडले आहे.

ज्या काव्याला प्लेटो असत्य मानतो तेच काव्य कलात्मक सत्य असल्याचे ॲरिस्टॉटल दाखवून देतो. ॲरिस्टॉटलने अनुकृतीचा वास्तवासी संबंध मांडला पण कलाकृती ही वास्तवाची हुबेहूब नक्कल मानली नाही. तिच्या संभाव्यतेला फार मोठी जागा दिलेली आहे. कलावंताच्या अंतरमनाच्या व्यापाराला त्याने स्थान दिले आहे. वास्तवाची जाणीव हा वाचकांवर होणारा परिणाम कलाकृतीचे उद्दिष्ट म्हणून मानले आहे. त्याच्या अनुकृतीत माणसांना, त्यांच्या कर्मांना आणि त्या माणसांच्या चांगल्या-वाईट स्वभावालाही महत्त्व दिले आहे. त्यामुळे ॲरिस्टॉटल प्लेटो पासून दूर जात असला तरी नीतीला त्याने मुठमाती दिलेली नाही. कलावंताच्या अंतरंगाइतकाच वाचकांच्या अंतरंगाचाही विचार ॲरिस्टॉटलने केलेला आहे. कारण ॲरिस्टॉटलने निर्माण केलेल्या माणसांच्या कृती-उक्तीचा वाचकांवर होणारा परिणाम हा कलाकृतीचा प्रधान येतो त्याने महत्त्वाचा म्हणून सांगितला आहे.

ॲरिस्टॉटलने त्याच्या समोर जे साहित्य उपलब्ध होते त्या आधारे साहित्याचे विवेचन केले आहे. त्याने वास्तव साहित्याला ललित साहित्या मानले. प्लेटोने ज्या काव्याला 'सत्याची प्रतिमा' मानले त्यालाच ॲरिस्टॉटलने 'सत्याची अनुकृती' असे म्हटले आहे आणि कला व विज्ञान या मधला फरक स्पष्ट केला आहे. ॲरिस्टॉटलने विशिष्ट घटना किंवा स्थूल प्रकारचे सत्य म्हणजे काव्य नाही असे सांगून सामान्य घटना आणि सत्याचे सूक्ष्मचित्रण साहित्यात असते याला महत्त्वाचे स्थान दिले आहे. ॲरिस्टॉटलने प्रमाणबद्धता ही कसोटी मानली आणि त्याने काव्याला राजनीती आणि नीतीशास्त्र यातून मुक्त केले.

प्लेटोच्या साहित्य विषयक मतांचा प्रतिवाद करताना ॲरिस्टॉटलने अनुकृती संदर्भात पुढील मध्ये मांडली आहे.

१) साहित्य हे अनुकरण नसून ते नवीन सृष्टी निर्माण करते.

२) साहित्य हे असत्य तर नाहीच उलट ते विश्वव्यापक स्वरूपाचे दर्शन घडवत असते.

३) मानवाच्या वासनातून साहित्य निर्माण होत नाही; तर ललिता कलाकृती माणसाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने वासनांचे विवेचन करते. त्यामुळे ती समाज घातक नसून समाज संवर्धक मानती पाहिजे.

तात्पर्य साहित्य ही एक नवीन सृष्टी असून तिच्यातले सत्य व्यापक स्वरूपाचे असते. ते माणसाला स्वास्थ्य देते. तेव्हा साहित्य मुळीच त्याज्य नाही. साहित्य हे केवळ अनुकरण नसून नवीन सृष्टी निर्माण करणारी पुनर्निर्मिती आहे. ही निर्मिती वास्तवातल्या आदर्श रूपाची जाणीव करून देणारी असते. ती साधारणीकरणाची क्रिया साधणारी आहे. असे विचार व्यक्त करताना ॲरिस्टॉटल हा काव्य समीक्षेचा पाया घालणारा पहिला समीक्षक ठरतो असे म्हणावे लागेल.

## १.३ पाश्चात्त्यांनी केलेल्या काव्यव्याख्या.

साहित्याची व्याख्या करणे तसे कठीणच आहे. व्याख्या ही  अव्याप्त नसावी तशी ती अतिव्याप्तही नसावी. ती अलंकारिक नसावी तशी भावात्मकही नसावी ही सर्व पथ्ये पाळून काव्याच्या व्याख्या करणे अवघड  आहे. कधीकधी काव्याचे स्वरूप, गुणधर्म व वैशिष्ट्ये विस्ताराने सांगणे उचित ठरते. या अर्थाने संस्कृत व पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील कितीतरी व्याख्या अपुऱ्या वाटतात. याचा अर्थ असा नाही की ह्या व्याख्या अर्थपूर्ण नाहीत एकाच व्याख्येत काव्याचे सर्व गुणविशेष एकत्र येणे अवघड असते. त्या दृष्टीने प्रत्येक व्याख्या काव्याचा एखादा विशेष प्रकट करीत असतात. अशाच काही काही पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील व्याख्या पुढीलप्रमाणे

**काव्य व्याख्या: वर्डस्वर्थ, कोलरिज, कोर्टहॉप,  एडगर ॲलन पो,  अर्नोल्ड**

अभिजातवादाला प्रतिक्रिया म्हणून पुढे आलेल्या रो रोमँटिसिझने नवी काव्यसंकल्पना घडवली .तिचा प्रभाव कमी अधिक प्रमाणात आजही कायम आहे. या परंपरेतल्या अनेक साहित्यशास्त्रज्ञांनी सौंदर्य हे काव्याचे मुख्य तत्व मानले आहे. हे सौंदर्य भावनेच्या अविष्कारात दडलेले असते. त्यामुळे भावनाविष्काराला या संकल्पनेत महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. या संदर्भातल्या काही व्याख्या पाहू.

१) वर्डस्वर्थ: "Poetry is the spontaneous overflow of powerful feeling."

'उत्कट भावनांचा उस्फूर्तपणे केलेला अविष्कार म्हणजे कविता होय'

२) कोलरिज: "The best words in best order."

'उत्तम क्रमात योजलेले उत्तम शब्द म्हणजे काव्य होय.'

३) कोर्टहॉप: "The art of producing pleasure by the just expression of imaginative thought and feeling"

'प्रतिभा विचार व भावना यांचा छंदोबद्ध भाषेत केलेल्या नेमक्या आविष्काराद्वारे निर्माण केलेला आनंद म्हणजे कविता होय.'

४) एडगर ॲलन पो: "The rhythmic creation of beauty."

'सौंदर्यांची (शब्दाद्वारा) लयबद्ध निर्मिती.'

५) अर्नोल्ड: "The most delightful and perfect form of attendance that human word can reach." 'भाषेद्वारा घडून येणारा अत्यंत अल्हाददायक आणि निर्दोष आविष्कार म्हणजे काव्य.'

६) हॅ जलिट: "The language of imagination and the passion."

'कल्पना आणि भावनोत्कटता यांची भाषा म्हणजे काव्य.'

७) रस्किन: "The suggestion by the imagination of noble grounds of the noble emotions."

'कल्पनेच्या साहाय्याने उदात्त भावनांची उच्च पातळीवर झालेली सूचक अभिव्यक्ती म्हणजे काव्य होय.'

**१) वर्डस्वार्थ आणि कोलरिज :** वर्डस्वर्थ आणि कोलरिज यांनी lyrical Ballads या संग्रहाच्या प्रस्तावनेत दिलेली काव्याची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे- "poetry is the spontaneous overflow of powerful feeling." 'भावनांचा उत्स्फूर्तपणे केलेला अविष्कार म्हणजे कविता' असे ते म्हणतात. पण या भावना कशा प्रकारच्या असाव्यात तेही त्यांनी पुढे "emotion recollected in tran quality" या शब्दात स्पष्ट केले आहे. म्हणजे, कवीच्या मनात प्रवाही असणाऱ्या कोणत्याही भावनांच्या अविष्काराला कविता म्हणता येणार नाही; तर या भावना चिंतन, मनानातून फुललेल्या असाव्या लागतात. कवीची मनोवृत्ती चिंतनशील असते. आपल्या अनुभवातील चांगले-वाईट, तात्कालिक -शाश्वत यांच्याकडे तो विवेकाने बघतो. त्याची ही चिंतनप्रक्रिया सातत्याने चालू राहत असल्याने आपोआपच अनुभवातील चांगला, शाश्वत आशय त्याला कळतो. अशा आशयामुळे त्याच्या भावना जागृत होतात व त्यांचा अविष्कार तो काव्यातून करत असतो. त्यामुळे कवितेतील अनुभव वैश्विक ठरतो.

**२) कोलरिजची :** आणखी दोन विधाने कवितेविषयीची त्याची संकल्पना समजावून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात. तो कवितेचे लक्षण पुढील शब्दात सांगतो- "the best words in best order." 'उत्तम शब्दांची उत्तम रचना म्हणजे कविता'. इथे उत्तम म्हणजे योग्य किंवा अनुरूप. म्हणजे भावनांच्या अविष्कारासाठी निवडलेले शब्द आणि त्या शब्दांच्या रचना यावर या व्याख्येत भर दिला आहे. कवितेत केवळ भावनांना महत्त्व नाही तर त्या भावनांचा अविष्कार कसा होतो यात खरे कवितेचे 'काव्यत्व' असते. असे कोलरिजचे म्हणणे आहे. त्याचे दुसरे विधान असे आहे- "poetry is the antithesis of science." रोमँटिसिझमची साहित्य विषयक भूमिका या व्याख्येतून व्यक्त होते. साहित्यात आणि विशेषतः कवितेत बुद्धी, विवेकवाद , विज्ञानवाद यांना मुळीच थारा नाही. या साऱ्यामुळे होणारे मानवी जीवनाचे आकलन एकांगी, अर्धवट असते. जीवनाचा 'संपूर्ण' अनुभव घ्यायचा असेल तर बुद्धिवादाचे ओझे झुगारून दिले पाहिजे. अशी भूमिका रोमँटिक कवींनी घेतली होती. कवितेत कल्पनाशक्ती आणि

तिच्याद्वारे केलेले भावनांचे प्रकटीकरण महत्त्वाचे असते. म्हणूनच कविता ही विज्ञानाच्या विरुद्ध असणारे विधान आहे, असे कोलरिज म्हणतो.

३) **कोर्टहॉप :** इंग्रजी साहित्याचा इतिहासकार कोर्टहॉप यांनी केलेली कवितेची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे- "The art of produacing pleasure by the just espression of imaginative thought and feeling metrical language." प्रातिभ विचार व भावना यांचा छंदोबद्ध भाषेत केलेल्या नेमक्या अविष्काराद्वारे निर्माण केलेला आनंद म्हणजे कविता. कोर्टहॉप याने विचार व भावना या दोन्हींचा उल्लेख केला असला तरी हे दोन्हीही प्रातिभ, कल्पना रम्य असले पाहिजेत आणि या भावना-विचारांचा अविष्कार करणारी शब्दकळा वृत्त-छंदात बांधलेली असावी, असे तो म्हणतो.कोर्टहॉपला भावनांची प्रतिभा शक्ती द्वारे होणारा अविष्कार अभिप्रेत आहे. म्हणजेच त्यावर बुद्धीचे नियंत्रण नको आहे. अशा भावनांचा छंदोबद्ध अविष्कार वाचकाच्या मनाला आनंदाचा अनुभव देतो असे त्याचे म्हणणे आहे.

४) **एडगर अलन पो** : एडगर अलन यांनी काव्यविषयक कल्पना मांडताना कवितेतील सांगीतिक तत्त्वावर अधिक भर दिला आहे .कविता म्हणजे "Rhythmic creation of beauty" असे तो म्हणतो. 'लयबद्ध सौंदर्याची निर्मिती म्हणजे कविता' कोर्टहॉपने काव्यातून मिळणाऱ्या आनंदाचा उल्लेख केला आहे. काव्यात असणाऱ्या सौंदर्यामुळे हा आनंदानुभव येत असतो. याच सौंदर्यावर एडगरने भर दिला आहे. पण कवितेत सौंदर्य कशामुळे निर्माण होते? कवितेतील लयबद्ध भाषा सौंदर्याची निर्मिती करते. पो यांच्या मते कविता ही वैचारिक किंवा नैतिक आशयापासून मुक्त असली पाहिजे. त्यामुळेच कवितेतील भाषेचा विचार करताना तो तिच्या आशयात्मक अंगाऐवजी तिच्यातील सांगीतिक तत्त्वाविषयीच विवेचन करतो. छंद किंवा वृत्तबद्धता, लयबद्धता आणि यमकबधता (meter, rhythm, rhyme ) या तीन गोष्टी कवितेसाठी अनिवार्य आहेत असे त्याने म्हटले आहे. कवितेचा विकास संगीताच्या दिशेने झाला पाहिजे असे तो म्हणतो. संगीत ही कला विशुद्ध सौंदर्य व्यक्त करते, असे म्हटले जाते. अशाच विशुद्ध सौंदर्याचा अविष्कार कवितेने केला पाहिजे. म्हणजे वरील अन्य मीमांसकाप्रमाणे पो हा देखील काव्यातील सौंदर्यावर भर देतो .मात्र हे सौंदर्य कवितेतील लयबद्ध, छंदोबद्ध उपाययोजनामुळे निर्माण होते, असे तो म्हणतो.

५) **अर्नोल्ड** : अर्नोल्ड याने काव्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे "The most delightful and perfect form of utterance that human words can reach ." 'भाषेद्वारे घडवून येणारा अत्यंत आल्हाददायक आणि निर्दोष आविष्कार म्हणजे काव्य.' याही व्याख्येत काव्याच्या भाषेवर, त्या भाषेद्वारे येणाऱ्या आनंददायक अनुभवावर भर दिलेला आहे. ही काव्य भाषा निर्दोष असावी म्हणजेच ती अनुभवांचे नेमके प्रकटीकरण करणारी असावी असा अर्थ अभिप्रेत आहे.

## १.४ समारोप

वरील काव्य संकल्पनांचा विचार केल्यानंतर त्यातील काही समान गुणधर्म ध्यानात येतात. अनुकृति सिद्धांत हा साहित्यातील आशयावर भर देणारा आहे. तर या काव्य संकल्पना साहित्यातील अनुभवापेक्षाही त्या अनुभवाचा अविष्कार, त्यातून प्रकटणारे सौंदर्य यांना अधोरेखित करणाऱ्या आहेत. बुद्धिवाद, विवेकवाद या आधुनिक जीवनदृष्टींना इथे विरोध आढळतो. कवीच्या मनातील कल्पनारम्य, मुक्त अशा भावनांचा अविष्कार महत्त्वाचा मानलेला दिसतो. काव्याचा अनुभव सौंदर्यपूर्ण असावा या अपेक्षेमुळे काव्य भाषेविषयी विशेष विचार केलेला आढळतो. काव्य भाषेतील लय, नाद, ताल, छंद ,वृत्त या बाबींना महत्त्व दिलेले दिसते. कारण या तंत्रांमुळे वेगळी, सौंदर्यपूर्ण अशी काव्यभाषा घडण्याला मदत होते.

साहित्याचा आजवरचा विचार हा त्यातील आशयतत्व किंवा सौंदर्यतत्व या दोहोंपैकी एका तत्त्वाला केंद्रस्थानी ठेवताना दिसतो. ज्या तत्त्वाला महत्व दिले त्यानुसार साहित्याचे गुणधर्म जाणवतात. वरील काव्यव्याख्यांमध्ये सौंदर्य हे तत्व केंद्रस्थानी आहे, त्यामुळे भाषा, शब्दकळा, कल्पनारम्य आविष्कार, भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार इत्यादी साहित्याचे गुणधर्म या व्याख्या मधून अधोरेखित होतात.

## १.५ संदर्भसूची

विजया राज्याध्यक्ष (समन्वयक संपादक), मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. ५० (रा. भा. पाटणकर)

पाटणकर वसंत : 'साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली (पुनर्मुद्रण),२०११

तुपे केशव (संपा) : 'साहित्यविचार भारतीय व पाश्चात्त्य', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, २०११

कुलकर्णी अ. वा. : 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी,१९९७

## १.६ नमुना प्रश्न

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी अनुकृती विषयी केलेल्या चर्चेचा परामर्श घ्या.

२) पाश्चात्त्य साहित्य तत्त्वज्ञांनी केलेल्या काव्य व्याख्यांचा सविस्तर मागोवा घ्या.

**टीपा लिहा**

१) प्लेटोने मांडलेला अनुकृतीचा विचार सविस्तर लिहा.

२) अरिस्टॉटलने मांडलेला अनुकृतीचा विचार सविस्तर लिहा

३) वर्ड्स्वर्थ, कोलरिज यांच्या काव्य व्याख्यांची चर्चा करा.

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'उत्कट भावनांचा उस्फूर्तपणे केलेला अविष्कार म्हणजे कविता होय' अशी काव्य व्याख्या कोणी मांडली आहे?

२) 'सौंदर्यांची (शब्दाद्वारा) लयबद्ध निर्मिती.' ही काव्य व्याख्या कोणाची आहे?

३) 'उत्तम शब्दांची उत्तम रचना' असे कवितेचे लक्षण कोणी सांगितले आहे?

४) प्लेटो ईश्वरनिर्मित पलंग कसा मानतो?

५) अनुकृतीला साहित्याची नक्कल कोणी म्हटलं आहे?

६) 'अनुकृती म्हणजे हुबेहूब नक्कल नसून ती एक पुनर्निर्मिती आहे' असे मत कोणी मांडले आहे?

❄❄❄❄❄❄❄

# २

# पाश्चात्य साहित्य विचार : साहित्याची भाषा

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ साहित्याची भाषा: १) रुपक २) प्रतिक ३) प्रतिमा.

२.२.२ साहित्याची भाषा : १) अनेकार्थता २) नियमोल्लघन ३) अपरिचितीकरण

२.३ समारोप

२.३ स्वाध्याय

२.४ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे

१ पाश्चात्य साहित्याचे स्वरूप समजून घेणे.

२ पाश्चात्य साहित्य विचारात साहित्याच्या भाषेचे स्वरूप समजावून घेणे

३ रूपक प्रतिमा व प्रतीक

४ अनेकार्थता, नियमोल्लंघन, अपरिचितीकरण

## २.१ प्रस्तावना :

विद्यार्थी मित्रांनो या प्रकरणात आपण पाश्यात्य साहित्य विचाराचा अभ्यास करणार आहोत.साहित्य आणि भाषा यांचा फार जवळचा संबंध आहे. साहित्याची भाषा ही साधारण पणे साहित्य निर्माण करीत असताना त्यामध्ये ज्या कलात्मक पणे ज्या घटना घडामोडी घडत असतात त्याला त्यांना आकार देण्याचे काम रुपक , प्रतिमा यांचा वापर करून साहित्य हे वाचनीय बनत असते. साहित्यामुळे समाज व्यवस्था टिकून राहत असते. लेखकाला जाणवलेले जीवनातील विविध छटा तो कलात्मकपणे साहित्यातून मांडत असतो. साहित्यातील अनुभूती ही लेखकांच्या मनोवृतीतून जन्म घेत असते . साहित्य निर्माण होत असताना लेखकांचा प्रभाव त्यांची सामाजिक परिस्थिती आणि त्यांची प्रतिभा त्यांनी वापरलेली रुपके यावरच साहित्य उत्कृष्ठ निर्माण होत असते. म्हणून या प्रकरणात साहित्याची भाषा याचा विचार खालील प्रमाणे करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ साहित्याची भाषा : १) रूपक २) प्रतिक ३) प्रतिमा.

**१ ) रूपक :** साहित्याचे माध्यम भाषा आहे. लेखकाला जाणवलेले जीवनाचे स्वरूप त्याच्या साहित्यामधून प्रकटत असते. त्याला जे अनुभव येत असतात, त्याच्या आधारेच त्याच्या साहित्यानुभवाचे रंग, रूप ठरत असते. लेखकाच्या अनुभवाचे आकलन त्याच्या साहित्यकृतीला आकार देत असते. साहित्यातील अनुभवाची निर्मिती साहित्यिकांच्या मनोविश्वाशी संबंधित असते. अर्थातच जीवनात येणारे अनुभव सुटे सुटे असतात, विस्कळीत असतात, त्यापैकी साहित्यामध्ये लेखकाची प्रतिभाशक्ती काही अनुभवांची निवड करीत असते. हे निवडलेले अनुभव कधी रूपक, प्रतिमा व प्रतीक या भाषिक घटकांच्या साहाय्याने कलात्मक, सौंदर्यात्मक रूपाने व्यक्त होत असतात. लेखकाला येणारे अनुभव पंचेद्रियांना जाणवत असतात, आकलन इंद्रिय संवेदनेतून व्यक्त होत असतात. त्यातून साहित्यकृतीमध्ये एक सौंदर्यरूप घेऊन आकारत असते. यातून साहित्य भाषा घडत असते.

‘रूपक प्रक्रिया ही काव्यसौंदर्याच्या गाभ्याला जाऊन भिडणारी आहे. ती प्रामुख्याने कविप्रवृत्तीशी निगडित आहे. कवी आणि सामान्य माणूस हे वास्तवसृष्टीतील एकच अनुभव घेत असले तरी त्यांच्या प्रकृतिधर्मांनुसार त्यांच्या अनुभवग्रहणात फरक पडतो. सामान्य माणूस फक्त अनुभव घेतो. पण कवीची अनुभव घेण्याची पद्धत द्विपदात्मक असते. तो एखादा अनुभव घेत असताना त्याचवेळी त्याची दुसऱ्या एका अनुभवांशी सांगड घालून त्यांच्यात एक समतानता प्रस्थापित करत असतो. मर्ढेकरांनी याला ‘भावनिक समतानता’ असे म्हटले आहे. हीच कविमनातील रूपक प्रक्रिया होय. अशी रूपक प्रक्रिया काव्यसौंदर्याचा एक प्रधान घटक ठरते. कवींचे सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक संस्कार त्याच्या रूपक प्रक्रियेत प्रतिबिंबित झालेले असतात. रूपकांच्या साहाय्याने कवी अर्थातील सूक्ष्मातिसूक्ष्म छटा व्यक्त करू शकतात.

व्यवहारभाषेत सामान्य लोक मोठ्या प्रमाणावर रूपकांचा वापर करीत असतात. ‘तो गाढव आहे’, ‘क्ष’ माकडतोंड्या आहे. ‘ऊन मी म्हणत होते’ हा शब्द आणि आशय यांच्यातील विस्तृत अंतर आणि त्यांच्या गुणधर्मातील परस्परांशी असलेले साहचर्य येथे असते. हे रूपकांमुळे लक्षात येते. दोन संवेदनाकृतींत किंवा मानसिक संदर्भात साधर्म्य संबंध प्रस्थापित होतात तेव्हा तेथे कळत न कळत तुलना झालेली असते. पण रूपकाची निर्मिती मात्र तुलना करण्यासाठी झालेली नसते. दोन मानसिक संदर्भातील अनेक घटक साधर्म्यवैधर्म्याच्या नात्याने एकजीव झाल्याने प्रत्ययाला येते’

रूपकांची काही पुढील उदाहरणे पाहा :

‘अवघे अंबर झाले झुंबर.....’

वसंत बापट यांच्या या ओळीतील ‘झुंबर’ या शब्दातून सप्तरंगी इंद्रधनुष्याची प्रकाशकिरणाची दृकसंवेदना स्पष्ट होते. झुंबरांची लोलकांतून झिरपणाऱ्या प्रकाशकिरणांची संवेदना वा त्याचा हा अर्थ ‘अंबर’ या शब्दाकडे स्थलांतरित होतो व रात्रीच्या वेळी आकाश झुंबरासारखे चमचमते हे आपणांस जाणवते.

विंदा करंदीकरांच्या पुढील ओळीतील रूपकात अर्थांतरप्रक्रिया घडताना दिसते.

डोळ्यांतल्या डोहामध्ये

खोल खोल नको जाऊं

मनांतल्या सावल्यांना

नको नको सखे पाहूं

पहिल्या दोन ओळीतील रूपक विचारात घेता. तुलनात्मक साधार्म्य लक्षात येते. डोहाचे पाणी जसे काळसर व अर्धपारदर्शक असते. त्यामुळे त्याचा तळ कळत नाही तशाच डोळ्यांतल्या बाहुत्याही काळसर व अर्धपारदर्शक असतात. त्यांचाही तळ कळत नाही. तळ कळाला नाही तरी डोह जसा खोल खोल वाटतो तसेच डोळेही खोल खोल वाटतात. भीती गूढता झपाटलेपणा इत्यादी भावनिक अर्थांच्या व त्यांच्याशी संलग्न असलेल्या अनुभवांच्या संदर्भात डोळे हे डोहच बनून गेलेले आहेत. कवितेमध्ये भावनिक अर्थांची संघटना बांधली जाते म्हणून कवितेत संश्लोषित रूपकांना फार महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे रूपकामध्ये अर्थांतराची व संश्लेषणाची प्रक्रिया घडते.

साहित्यात काही वेळा सांकेतिक रूळलेली अशी रूपके वापरलेली असली तरी चांगल्या साहित्यकृतीच्या बाबतीत रूपके नवा अर्थ धारण करतात. नवनिर्मिती सचेतनता हा साहित्यकृतीतील रूपकांचा गुणधर्मच आहे. साहित्याच्या क्षेत्रातील रूपके ही मुख्यत्वे व्यक्तिनिष्ठ स्वरूपाची लेखकाच्या आंतरिक जीवनाशी नाते सांगणारी असतात. रूपकांचे स्वरूप हे अनेक गोष्टींमुळे बदलत असते. भाषा कवीचे अनुभवक्षेत्र व जीवनदृष्टी स्थळ काळ व एकूणच सांस्कृतिक जीवन या व अशा अनेक घटकांवर रूपकांचे स्वरूप बदलत असते.

**२) प्रतिमा:** कवीच्या, लेखकाच्या जीवनानुभूतीचा विशिष्ट भाषिक रूपबंधाच्या साहाय्याने ऐंद्रिय स्वरूपात जेव्हा प्रत्यय येतो तेव्हा त्या भाषिक रूपबंधाला प्रतिमा असे म्हटले जाते. भाषिक

रूपबंधातून संवेदनांची पुनर्निर्मिती करणे, ऐंद्रिय संवेदना व्यक्त करणे हे प्रतिमेत घडत असते इंद्रियगोचरता हा प्रतिमेचा प्रधान गुणधर्म आहे. कविता ही प्रतिमांची संघटना असते. रंग, रूप, वास, चव आणि नाद या संवेदनांची पुनर्निर्मिती करण्याचे प्रतिमा हे परिणामकारक साधन आहे.

प्रतिमांमधून अंतर्मनाचे अबोध स्तरावरील व्यापार प्रभावीपणे व्यक्त होऊ शकतात. अबोध मनाशी संबंधित प्रतिमा या अधिक गुंतागुंतीच्या व व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या असतात. आतार्किक अर्थाचा आदिम संवेदनपर अशा अर्थाचा आविष्कार त्यांतून होत असतो.

कसे केव्हा कलंडते

माझ्या मनाचे आभाळ

आणि चंद्रचांदण्यांचा

दूर पोचतो ओघळ

अनेक वेळा वाचकाला प्रतिमेतील सर्वच अर्थ शोधता येत नाहीत. इंदिरा संतांच्या वरील प्रतिमेत संदिग्धता जाणवते. ही संदिग्धताही तिचे बळ असते. मर्ढेकरांच्या एका कवितेत -

आला आषाढ श्रावण
आल्या पावसाच्या सरी
किती चातकचोचीनें
प्यावा वर्षाऋतू तरी

या ओळीत येणारी चातकचोचीची प्रतिमा सांकेतिक आहे. तिच्यात नावीन्य, ताजेपणा, उत्कटता व मूलभूतता नाही. परंतु कवीच्या संवेदनाप्रकृतीमुळे तिला एक नवी अर्थपूर्णता येते. प्रतिमेचे नावीन्य ठळकपणा ताजेपणा नेमकेपणा उत्कटता स्पष्टपणा मूलभूतता हे प्रतिमेचे महत्त्वाचे गुणधर्म सांगितले जातात.

ओशाळला येथे यम
वीज ओशाळली थोडी
धावणाऱ्या क्षणालाही
आली ओलसर गोडी

हा नवा संदर्भ या कवितेत येताच चातकचोचीची प्रतिमा सांकेतिक राहत नाही. मृत्यू व जीवन यांच्या अर्थपूर्णतेचा शोध हे मर्ढेकरांच्या संवेदनप्रकृतीचे वैशिष्ट्य होते.

प्रतिमांची विविध प्रकारची वर्गीकरणे केली जातात. उदाहरणार्थ इंद्रीयांच्या आधारे केलेले वर्गीकरण, लुप्त प्रतिमा, प्रक्षोभक प्रतिमा, प्रसरणशील प्रतिमा, सजावटी प्रतिमा, मूलाश्रयी प्रतिमा, गतिशील प्रतिमा, बद्ध प्रतिमा, मुक्त प्रतिमा, स्थितिशील प्रतिमा असे प्रतिमांचे अनेक प्रकार केले जातात.

पाश्चात्य परंपरेतील प्रतीकवादी व प्रतिमावादी काव्याचा प्रभाव मराठी कवितेवर पडू लागला. अर्थात ह्या प्रभावातून मराठी कवितेमध्ये प्रतीकवादी व प्रतिमावादी काव्य निर्माण झाले असे काटेकोरपणे म्हणता येणार नाही. परंतु या काळात कवितेत प्रतिमा प्रतिकांची योजना अधिक प्रमाणात होऊ लागली.

प्रतिमा हा काव्याचा मूलभूत घटक आहे त्याशिवाय काव्य शक्य नाही. अशा धारणेतून कविता लिहिली जाऊ लागली. अनेक कवी आपला अनुभव प्रतिमा प्रतीकांतून मांडू लागले. त्यामुळे कविता म्हणजे प्रतिमांची संघटना किंवा एक अखंड प्रतिमाच असे स्वरूप कवितेला प्राप्त झाले.

ज्याला प्रतिमावादी असे व्यापक अर्थाने म्हणता येईल अशी कविता या काळात मुख्यत्वे इंदिरा संत सदानंद रेगे मंगेश पाडगावकर व आरती प्रभू यांनी लिहिलेली आहे. केवळ संवेदनांच चित्रे म्हणता येतील अशा अनेक कविता सदानंद रेग्यांनी लिहिल्या आहेत.

उदाहरणार्थ 'पाऊसपक्षी' ही छोटीशी कविता हीच एक प्रतिमा आहे.

पाऊसपक्षी

कृष्णसांवळा

शालिग्रामसा

श्यामलसुंदर

**३) प्रतीक (Symbol) :** एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पाश्चात्य कवितेत प्रतीकवाद (Symbolism) नावाची चळवळ होऊन गेली. तिच्या अनुयायांनी प्रतीके ही काव्याची भाषा असते अशी भूमिका घेतली.

प्रतीक ही संज्ञा तर्कशास्त्र गणितशास्त्र येथपासून ते थेट काव्यशास्त्रपर्यंत अनेक शास्त्रंत वापरली जाते असे रेने वेलेक व ऑस्टिन यांनी म्हटले आहे. 'प्रतीक ही संज्ञा प्रत्येक शास्त्रच्या गरजेप्रमाणे भिन्न भिन्न अर्थांनी वापरली जाते.' फॉसच्या मते प्रतीक हे विशिष्ट अर्थाचा निर्देश करणारे असते आणि ते सहजपणे विश्लोषिता येते. कुठल्या तरी वस्तूचे किंवा संकल्पनेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वस्तूला किंवा आकृतीला अरबान चिन्ह असे म्हणतात. प्रतीकातील प्रतिनिधित्व करणारी वस्तू आणि ती जिचे प्रतिनिधित्व करते ती वस्तू यांचे नाते बिंब प्रतिबिंबासारखे नसते तर या दोहोंकडे एकाच समान भूमिकेतून पाहिल्यामुळे ते निर्माण झालेले असते. कवितेतील प्रतीके ही मूळत रूपकेच असतात आणि ती रूपकांतून जन्मतात ज्या रूपकांत आत्मिक (Ideal) आशय समाविष्ट झालेला असतो ती रूपके प्रतीक बनतात असेही अरबानने म्हटले आहे.

व्यापक अर्थाने 'दुसऱ्या गोष्टींचे निर्देशन वा प्रतिनिधित्व करणारी कोणतीही गोष्ट म्हणजे प्रतीक होय' या अर्थाने सर्व भाषाच प्रतीकात्म असते. सामान्यत साहित्याच्या क्षेत्रात कोणत्यातरी विशिष्ट अर्थाने सूचन करणारा एखादा शब्द वा शब्दसमूह जेव्हा त्याच्या पलीकडील कोणत्यातरी अन्य गोष्टीचे निर्देशन करतो तेव्हा त्याला प्रतीक असे म्हटले जाते. या अन्य गोष्टी वस्तू विचार कल्पना अनुभव भावना घटना अशा कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. धर्म कला - साहित्य इत्यादींमध्ये प्रतीकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. यातील प्रतीके सूक्ष्म व अनेकार्थाचे सूचन करतात. ही प्रतीके सेंद्रिय स्वरूपाची असल्यामुळे ती स्वतकडे लक्ष वेधून घेत असतात. प्रतीके ही मुख्यत्वे सामूहिक स्वरूपाची असतात. परंतु आधुनिक कलांच्या क्षेत्रात प्रतीकांचा उपयोग व्यक्तिनिष्ठ रीतीने केला जातो. काव्यामध्ये प्रतीकांचा व्यक्तिनिष्ठ वापर अधिक प्रमाणात दिसतो. अनेकदा विशिष्ट रूपके वा प्रतिमा यांचा अधिक प्रमाणात वापर झाला की त्यांना प्रातिनिधिक सार्व त्रिक रूप लाभते तेव्हा त्याचे प्रतीकात रूपांतर होत असते. पुनरावृत्ती हे प्रतीकांचे एक वैशिष्ट्ये असते.

विंदा करंदीकरांच्या 'चिंधी' या कवितेतील चिंधी पीडितांच्या शोषितांच्या दुखाचे प्रतीक आहे. विंदांच्या 'दातापासून दाताकडे' या कवितेत दात हे पिळवणुकीचे प्रतीक होत.

पु.शि.रेगे यांची 'सावित्री' ही कादंबरी सावित्रीचा प्रेमानुभव, कलानुभव व्यक्त करताना अनेक प्रतिमा, प्रतीकांना जन्म देते. त्यातील 'मोराचे नृत्य', 'गाणारे झाड' ही नृत्यनाटके सर्जनशीलतेचे प्रतीक होते. या कादंबरीमधील 'राधा कृष्ण होते व कृष्ण राधा होतो' हे मेवाड शैलीतील राधाकृष्णाचे चित्र एकरूपतेचे स्व, विसरणे असा प्रतीकात्मक अर्थ व्यक्त करते.

जी.ए.कुलकर्णी यांच्या काही कथाच प्रतीकात्मक आहेत. या कथा म्हणजे 'प्रवासी' 'गुलाम', 'यात्रिक', 'ठिपका', 'विदूषक', 'रक्तमुखी', 'इस्किलार' 'काली', 'दीक्षा', 'दिपस्तंभ', 'कांचनमृग' आणि 'गीतापाखरू' या प्रवास कथांमधील प्रवासाचे प्रतिक आध्यात्मिक प्रवास व श्रेयसाचा शोध प्रवास असा प्रतीकात्मक आहे. अशा प्रकारे कवी लेखक नवीन प्रतिके निर्माण करतात. त्यांचा साभिप्राय उपयोग करून जीवनाचा अर्थ व्यक्त करतात. मानवी जीवनाची विविधस्वरूपी जाण देण्याची, नावीन्यपूर्ण अर्थाचे सूचन करण्याची क्षमता भाषिक प्रतीकांमध्ये असते. काही प्रतीकांमध्ये अर्थाची गुंतागुंत नसते. उदाहरणार्थ कुसुमाग्रजांची 'आगगडी' व 'जमीन', 'पाचोळा', 'अहिनकुल ही प्रतीके, तर काही प्रतीकांमध्ये जीवनाची गूढता, गहनता व्यामिश्र अशा रूपबंधातून व्यक्त केली जाते. उदाहरणार्थ बालकवींचे 'पारवा' हे प्रतीक दिलीप चित्रे यांचे बुरूज हे प्रतीक किंवा वसंत डहाके यांचे योगभ्रष्ट हे प्रतीक. आरती प्रभूंच्या दिवेलागण या काव्य संग्रहात सांजवेळ सांज संध्याकाळ हे शब्द मृत्यूच्या जाणिवेचे प्रतीक म्हणून येतात.

प्रतीकांमध्ये व्यक्त होणारा अर्थ हा त्या त्या काळातील एकूणच संस्कृतीशी सांस्कृतिक संचिताशी निगडित असतो. संस्कृतीमधील अनेक सूक्ष्म अर्थघटकांचे सूचन या प्रतीकांतून होत असते. उदाहरणार्थ नंदीबैल स्त्रचे कुंकू बांगड्या समिधा वटवृक्ष यांसारखी प्रतीके ही खास मराठी संस्कृतीची प्रतीके आहेत. त्या त्या संस्कृतीमधील मिथ्स ह्या देखील प्रतीकात्मकच असतात.

## २.साहित्याची भाषा : अनेकार्थता, नियमोल्लघन, अपरिचितीकरण

**१) अनेकार्थता :** साहित्याचे त्याचे माध्यम भाषा आहे. ती दैनंदिन व्यवहारात व ज्ञानव्यवहारात सातत्याने वापरली जाते. तीच भाषा जेव्हा साहित्याचे माध्यम बनते तेव्हा काही तंत्राचा वापर करून लेखक साहित्य भाषा घडवत असतो त्यावेळी ती सौंदर्यनिर्मितीचे कार्य करते. साहित्यभाषेसंबंधी पाश्चात्य साहित्य परंपरेत मांडण्यात आलेल्या काही संकल्पर्नासिद्धान्त अभ्यासता येतील. पाश्चात्य देशात नवसमीक्षेला खरा प्रारंभ झाला तो रिचर्डस आणि एलियट यांच्या लेखनाने सायन्स ऍण्ड पोएट्री या रिचड्च्या ग्रंथात त्याने कवितेच्या भाषेच्या कवितेच्या वाचनाचा आपल्या मनावर होणारा परिणाम याचा सविस्तर विचार केला आहे. साहित्यकृतीची संहिता ही एखाद्या सेंद्रिय जीवाप्रमाणे कार्य करते त्यामुळे साहित्यकृतीच्या संहितेचे सूक्ष्म अध्ययन केले पाहिजे. लहान लहान घटकांकडेही काळजीपूर्व क पाहिले पाहीजे या त्यांच्या विचारांचा नंतरच्या समीक्षकांवर प्रभाव पडला. त्यांच्या सूक्ष्म वाचनांच्या सिद्धान्ताचा त्यांचे शिष्य विल्यम एम्पसन यांच्यावर सर्वाधिक प्रभाव पडलेला दिसतो. त्यांनी लिहिलेल्या सेव्हन टाइप्स ऑफ ॲम्बिग्विटी या ग्रंथात कवितेच्या अनेकार्थ तेचे सात प्रकार केलेले आहेत या मध्ये कवितेच्या सूक्ष्म वाचनात काव्यत्म अनेकार्थता कशी व्यक्त हेते ते स्पष्ट झाले आहे.

विल्यम एम्पसनने अनेकार्थसूचकता (ambiguity) हा काव्याचा पायाच मानला आहे. त्यांच्या मते बौद्धिक, तार्किक व्यापारात जेव्हा भाषा वापरली जाते तेव्हा ती एकार्थ वाचक होते. परंतु काव्याच्या भाषेत अनेकार्थतेचा कौशल्याने उपयोग केलेला असतो. आपल्या नेहमीच्या व्यवहारात आपण संदेशनासाठी एकार्थवाचक भाषा वापरत असतो. काव्यात अनेक अर्थछटा निर्माण करून काव्यातील अर्थ संपन्न केला जातो. कवीच्या भाषेचे

मुख्य उद्दिष्ट अनेकार्थ निर्माण करून वाचकाच्या मनात अत्यंत संमि प्रतिक्रिया निर्माण करणे हे असते. कवी अनेकार्थतेचा मोठ्या कुशलतेने उपयोग करून घेतात. कवी विविध प्रकारचे जास्तीत जास्त अर्थ शब्दांतून व्यक्त करतात. त्यांचा भर अनेकार्थ सूचकतेवर असतो. कवीच्या भाषेत हे जे एकाच भाषिक भागाबाबत विविध प्रतिक्रिया निर्माण करण्याचे वैशिष्टयपूर्ण सामर्थ्य असते त्यालाच एम्पसन अनेकार्थता असे म्हणतो. एकीकडे अर्थ फुलवताना दुसरीकडे त्या अर्थामध्ये एकात्मता निर्माण करण्याचे कार्य ही केले जाते. एम्पसनच्या मते 'अनेकार्थता' हे काव्याचे व्यवच्छेदक तत्त्वच आहे. अनेकार्थता हे चांगल्या काव्याचा पाया आहे. एवढेच नव्हे तर ते काव्याचे लक्षण आहे काव्याच्या मूल्यमापनाचा तो प्रमुख निकष आहे.

भा.रा.तांबे यांची 'नववधू प्रिया मी बावरते' ही कविता कोणा एका नववधूचे मनोगत आहे असे वाटते. तर दुसरा अर्थ आध्यात्मिक दृष्टिकोनातून व्यक्त होतो. आत्मापरमात्म्याची जिर्वाशिवाची भेट असा ही अर्थ घेतला आहे.

'औदुंबर' या बालकवींच्या कवितेचे सौंदर्य, अर्थ अनेकांनी वर्णन केले आहेत. 'औदुंबर' हे एका खेड्याचे निसर्गचित्र डोळ्यासमोर ऊभे करते तसेच दि.के.बेडेकरांना हा औदुंबर शेवटच्या विरागी अवस्थेला पोचलेला योगी दिसतो. कुसुमाग्रजांना औदुंबर हा सर्व कवितेवरती आपले वर्चस्व गाजवणारा वाटतो. असे विविध अर्थ औदुबर या कवितेमधून जाणवले आहेत.

केशवसुतांची 'हरपले श्रेय' बालकवींच्या 'फुलराणी ', 'संध्यातारक', प्रेमलेखर', पु.शि.रेगे यांची 'पक्षी जे झाडावर गाणे गातो'. या कवितांचे विविध अर्थ समीक्षकांनी स्पष्ट केले आहेत.

कवितेच्या वेगवेगळ्यांच्या वाचनातून तसेच आपल्याच वेगवेगळ्या वाचनातून अर्थाच्या अनेकानेक शक्यता आपल्याला जाणवतात. अनेकार्थतेच्या विविध परी असू शकतात त्यावरून एम्पसनयाने अनेकार्थतेचे सात प्रकार केले आहेत : कवितेत एकाहून अधिक अर्थ असतात ते तार्किक दिशेने जातात. कधी एका शब्दाचे दोन अर्थ असतात, परंतु एकच तर्कदृष्टीने सुसंगत असतात. कधी परस्परविरोधी अर्थ असतात. कवितेतील तपशील हा वेगवेगळ्या संदर्भाशी, वस्तुस्थितींशी नाते सांगतो. संदर्भाच्या संगतीमुळे दोन वेगवेगळे विचार परस्परांशी संबद्ध होतात. विल्यम एम्पसन यांच्या मते कवितेतील अनेकार्थतेमुळेच ती खेऱ्या अर्थाने कविता ठरते. अनेकार्थता हे चांगल्या काव्याचा पाया आहे. कवी या अनेकार्थतेचा कौशल्याने उपयोग करून घेतो. काव्याच्या मूल्यमापनाचा प्रमुख निकष म्हणून अनेकार्थता या तत्त्वाकडे पाहिले जाते.

**२) नियमोल्लंघन 'फोअरग्राऊंडिंग' :** प्राग परंपरेतील एक झेक संरचनावादी भाषाशास्त्र जॅन मुकॉरोवस्की यांनी नियमोल्लंघन (Foregrounding) ही संकल्पना काव्यभाषेच्या संदर्भात मांडली आहे. त्याच्या मते संदेशनाचे कार्य करणारा दैनंदिन भाषिक व्यवहार व्याकरणिक नियम व्यवस्थेच्या आधारे चाललेला असतो. या व्यवहारात यांत्रिक स्वरूपाची नियमबद्धता, अतिपरिचितीकरण (automatization) असते. काव्यात्म वा सौंदर्यात्म कार्यामध्ये भाषा नियमानुसार वापरण्याची आवश्यकता नसते. याउलट कवितेत नेहमीच्या भाषिक संकेतांचे व्याकरणिक नियमाचे सहेतुक उल्लंघन केलेले असते. हे उल्लंघन भाषेच्या ध्वनी, शब्द, वाक्य आणि अर्थ अशा चारही पातळ्यांवर होत असते. या

उल्लंघनामुळे, मोडतोडीमुळे भाषेला वेगळा उठाव दिला जातो. त्यातून काव्यभाषा अस्तित्वात येते. नियमोल्लंघनामुळे अनपेक्षित अर्थव्यक्ती साधली जाते.

पु.शि.रेगे यांच्या 'पाहिले न पाहिले' या कवितेत 'झनन-झांजरे', 'ठिंबक-ठाकडे', बहर-बाबरे' हे शब्द प्रत्येक कडव्यात ध्वनीची नियमित अंतराने पुनरावृत्ती करतात. कवितेच्या चरणांची व कडव्याची लयबद्ध व प्रमाणबद्ध बांधणी करतात.

आपल्या अनुभवांच्या विविध अर्थच्छटा व्यक्त करण्यासाठी भाषेतील शब्दांना वेगळे रूप देण्याची, शब्दांसंबंधीचे संकेत, नियम दूर सारण्याची प्रवृत्ती कवींमध्ये दिसून येते. उदाहरणार्थ, मर्ढेकरांच्या काव्यातील पंक्चरलेली रात्र पंपतो काळोख, टरकतु, रबरी रात्र, अश्रु भुंकतात उगीचता हे शब्द, पु.शि.रेगे यांच्या कवितेतील 'पुष्कळा', 'पुष्कळणारी, रक्तपालवी, गंधरेखा, मनबाधा हे चमत्कारिक शब्द नियमांचे उल्लंघन करणारे आहेत. कवी ग्रेस यांचे रक्तगंध, अंधारबन, छायावेळ, चंद्रशिल्प, चंद्रधून इत्यादी सर्व शब्द नियमोर्ल्लघनाची उदाहरणे आहेत.

काही वेळा कवी वाक्यरचनेच्या नियमांचा हेतुत : भंग करून वेगळा परिणाम साधतात. उदाहरणार्थ, मर्ढेकरांची प्रसिद्ध ओळ म्हणजे 'पिपांत मेले ओल्या उंदिर' येथे 'ओल्या पिपात उंदीर मेले' हा वाक्याचा स्वाभाविक क्रम आहे. परंतु मर्ढेकरानी हा संकेतबद्ध क्रम हेतुत: उलटासुलटा केला आहे.

पु.शि.रेगे यांच्या 'त्रिधा राधा' या कवितेतील ही ओळ 'बन झुकले कांठी राधा' येथे वाक्यरचनेत नियमोल्लंघन केले आहे.

अर्थाच्या पातळीवर कोणत्या गोष्टीचा कोणत्या गोष्टीशी संबंध यावा हे संकेताने ठरलेले असते. कवी या संकेतांचे उल्लंघन करून काव्यात्मदृष्ट्या वेगळा परिणाम साधण्याचा प्रयत्न करत असतो. 'जेथे जातो तेथे । मी माझा सांगती' (बा.मी.मर्ढेकर) मूळात तुकारामांच्या अभंगामध्ये 'जेथे जातो तेथे । तू माझा सांगाती ।' या रचनेला अर्थ दृष्टीने विरोध दर्शवला आहे. अशा प्रकारच्या नियमोल्लंघनामुळे कवितेच्या अंगी सौंदर्या निर्मितीची क्षमता येते.

**अपरिचितीकरण (Defamiliarization) :** व्हिक्टर शक्लोव्हस्की यांच्या १९१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'कला : एक तंत्र (आर्ट ॲज टेक्निक) या लेखात अपरिचितीकरणाची संकल्पना मांडलेली आहे. 'कला म्हणजे प्रतिमाच्या साहाय्याने केलेला विचार' या पोटेल्या यांच्या विचाराचा प्रतिवाद करताना शक्लोव्हस्की यांनी ही संकल्पना मांडलेली आहे. रशियन रूपवादाच्या समीक्षाप्रवाहातील ही महत्त्वाची संकल्पना आहे.

भाषा दैनंदिन व्यवहारात व इतर क्षेत्रांत वारंवार वापरल्यामुळे तिचे संदर्भ यांच्यात एकप्रकारचा तोच तोचपणा, गुळगुळीतपणा आलेला असतो. लेखक या भाषेची म्हणजेच त्या भाषेतील जीवनानुभवाची एका वेगळ्या प्रकारे रचना करतो. त्यामुळे एक वेगळाच अर्थ, वेगळाच अनुभव वाचकाला प्राप्त होतो. अशाप्रकारे लेखक सर्वसामान्य भाषेचे, आणि पर्यायात जीवनानुभवाचे 'अनोखीकरण' करत असतो यालाच अपरिचितीकरण असे म्हणतात.

कवितेत व्यवहारिक भाषाच वापरलेली असते. परंतु या परिचित भाषेला विविध प्रयुक्त्यांनी अपरिचित रूप दिले जाते. कवितेतील लय, यमके इत्यादींमुळे परिचित भाषा अपरिचित होते. त्यामुळे रूळलेले, साचेबंद झालेले आकलन, संवेदन बदलते ते संवेदन नवे, ताजे होते.

कुट्ट पिवळ्या पहाटी

आरवतो दैनंदिन भोंगा (मर्ढेकर)

मर्ढेकरांनी आपल्या कवितेत ग्रामीण जीवनाचा दिनक्रम कोंबड्याच्या आरवण्याने सुरू होतो. त्यासाठी 'कोंबडा आरवणे' हा सुपरिचित शब्द वापरला आहे. पण त्याची जागा महानगरातील यंत्रसंस्कृतीने घेतल्यामुळे 'भोंगा वाजतो' या शब्दाच्या ऐवजी 'आरवतो भोंगा' हा अपरिचित शब्दाचा वापर करून वाचकाचे लक्ष वेधून घेतले आहे.

**आपली प्रगती तपासा:**

साहित्याच्या भाषेमधील रूपक प्रतिमा यांचे स्वरूप स्पष्ट करा.

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

## २.२ समारोप

अशा प्रकारे आपणास पाश्यात्य साहित्य विचाराचा अभ्यास करीत असताना लेखकांच्या विविध कल्पना शक्तीचा आणि त्यांनी साहित्यात वापरलेल्या विविध प्रतीक, प्रतिमा रुपकांचा वापर करून साहित्य निर्माण केले जाते.लेखकांच्या अनुभवाच्या ठिकाणी कल्पनेचा वापर करून दर्जेदार साहित्य निर्माण केले जाते. त्यात वापरलेल्या रुपक , प्रतिमा , यांचा वापर करून साहित्य निर्माण होत असते. अशा प्रकारे आपणास वरील प्रमाणे साहित्याच्या भाषेचा अभ्यास करावा लागेल.

## २.३ स्वाध्याय

१. साहित्याच्या भाषेमधील रूपक प्रतिमा यांचे स्वरूप स्पष्ट करा.

२. अनेकार्थता आणि नियमोल्लंघन या तत्त्वांच्या साहाय्याने साहित्यभाषेविषयीचे विवेचन करा.

३. साहित्य भाषेसंबंधीच्या प्रतिमा व प्रतीक यांचे कार्य स्पष्ट करा.

४. साहित्याची भाषा म्हणून रूपक व प्रतीके यांचे स्वरूप स्पष्ट करा.

५. अनेकार्थता व अपरिचितीकरण या संकल्पनांचे साहित्यभाषेच्या संदर्भात विवेचन करा.

६. अनेकार्थता आणि नियमोल्लंघन या तत्त्वांच्या साहाय्याने साहित्यभाषेविषयीचे विवेचन करा.

७. नियमोल्लंघन व अपरिचितीकरण या संकल्पनांच्या आधारे साहित्यभाषेचे स्वरूप सोदाहरणासह स्पष्ट करा.

८. साहित्यभाषेतील रूपक प्रतिमा व प्रतीक यांचे कार्य स्पष्ट करा.

९. अनेकार्थता व अपरिचितीकरण या संकल्पनांच्या साहाय्याने साहित्यभाषा कशी घडते याविषयी विवेचन करा.

## २.४ संदर्भ ग्रंथ

१. साहित्यशास्त्र स्वरूप आणि समस्या वसंत पाटणकर

२. कविता आणि प्रतिमा सुधीर रसाळ

३. पाश्चात्य साहित्यविचार प्रा.भालचंद्र खांडेकर डॉ.लीला गोविलकर

४. सौंदर्यमीमांसा रा.भा.पाटणकर

५. काव्यशास्त्र प्रदीप डॉ.स.रा.गाडगीळ

६. साहित्य विचार संपादक डॉ.दत्तात्रेय पुंडे डॉ.स्नेहल तावरे

७. कवितेचा शोध वसंत पाटणकर प्रश्न

❄❄❄❄❄❄❄

# ३

# साहित्याची निर्मिती प्रक्रिया

**घटक रचना**

३.० उद्देश :

३.१ प्रस्तावना :

३.२ विषय विवेचन

३.२.१ साहित्य निर्मिती प्रक्रिया पाश्चात्य साहित्याचे प्रयोजन विचार

अ) आत्माविष्कार

ब) जिवनभाष्य

क ) सामाजिक बांधिलकी (मार्क्सवादी विचारासह)

३.३ कोलरिजचा कल्पनाशक्तीचा सिद्धांत व चमकृतिशक्तीचा सिद्धांत –

अ) प्रथम श्रेणीची कल्पनाशक्ती

ब) द्वितीयणीची कल्पनाशक्ती

क) चमत्कृतिशक्ती

३.४ संदर्भ ग्रंथ

३.५ स्वाध्याय

## ३.० उद्देश

१) साहित्य म्हणजे काय हे समजेल

२) साहित्य आणि सामाजिक बांधिलकी यातील फरक समजण्यास मदत होईल .

३) साहित्यातील प्रतिभा, आणि कल्पनाशक्ती यातील फरक समजेल.

४) साहित्यातील आत्मविष्कार समजेल.

## ३.१ प्रस्तावना

कलानिर्मिती, साहित्यनिर्मिती कशी होते, याविषयी सर्वांनाच कुतूहल असते. याचे कारण म्हणजे कला, साहित्य या गोष्टी मूल्ययुक्त आहेत असे आपण मानतो. या मुल्ययुक्त गोष्टी कशा निर्माण होतात याविषयी कुतूहल असते. दुसरे म्हणजे या गोष्टी सर्वांनाच निर्माण करता येत नाहीत. त्या केवळ प्रयत्नसाध्य नाहीत हेही दिसून येते. त्यामुळे काही मोजक्या लोकांना लाभलेल्या या देणगीचे स्वरूप काय आहे, ते जाणून घेण्याची इच्छा आपल्याला असते.

कला साहित्यनिर्मिती मागील प्रेरक शक्ती कोणती आहे, तिचे स्वरूप काय आहे आणि तिचे कार्य कशाप्रकारे चालते असे काही प्रश्न या संदर्भात निर्माण होतात.

भारतीय साहित्यशास्त्रत प्रतिभा ही साहित्यनिर्मितीच्या मुळाशी असलेली सर्वात महत्त्वाची शक्ती मानली जाते. तर पाश्चात्य काव्यशास्त्रत (Imagination) 'इमॅजिनेशन' ही संज्ञा वापरली जाते. ही संज्ञा अनेकार्थी आहे. या संज्ञेचे शब्दकोशातील अर्थ विविध आहेत. 'कल्पना' म्हणजे मन:पटलावर चित्र उमटविणारी मानसिक शक्ती, युक्ती, विचार, तर्क, आभास, तरंग, हेतू गृहीत धरणे, मनात केलेली योजना इत्यादी अर्थ आहेत.

कला क्षेत्रामध्ये कल्पनाशक्ती ही संज्ञा सामान्यत: नवनिर्मिती करणारी शक्ती म्हणजेच 'प्रतिभा' या अर्थाने वापरली जाते. कल्पनाशक्ती म्हणजे वास्तवापेक्षा वेगळी अद्भुत काल्पनिक विश्व निर्माण करणारी शक्ती या अर्थाने कल्पनाशक्तीचा निर्देश केला जातो.

'कलेच्या क्षेत्रात कल्पनाशक्तीचा वापर कसा चालतो या संदर्भात सिद्धान्त मांडले गेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने कांट व कोलरिज यांचे सिद्धांत महत्त्वाचे आहेत.

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कांट याने कल्पनाशक्ती (Imagination) आणि प्रतिभा (Genius) या दोन्ही संकल्पना स्वीकारल्या आहेत. कल्पनाशक्ती ही ज्ञानाला कारणीभूत होणारी एक शक्ती आहे. माणूस प्रयत्नाने शिक्षणाने प्रतिभावंत होत नाही तो प्रतिभावत म्हणून जन्मावा लागतो. कोलरिजच्या कल्पनाशक्तीच्या सिद्धान्तांवर कांटच्या विचाराचा प्रभाव दिसतो.

'एस.टी.कोलरिजचा कल्पनाशक्तीचा सिद्धांत : (Imagination / Esemplastic Power) कोलरिजने त्याच्या 'बायोग्राफिया लिटरारिया' या ग्रंथाच्या तेराव्या प्रकरणात कल्पनाशक्तीचा सिद्धांत मांडला आहे. तो असा आहे : कल्पनाशक्ती दोन प्रकारची असते. एक प्रथम श्रेणीची व दुसरी द्वितीय श्रेणीची.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ साहित्य निर्मिती प्रक्रिया पाश्चात्य साहित्याचे प्रयोजन विचार

या घटकामध्ये साहित्याच्या प्रयोजनाचा विचार केला आहे. 'प्रयोजन' या संज्ञेला पर्यायी म्हणून 'हेतू', 'उद्दिष्ट ', 'साध्य' अशा संज्ञा वापरल्या जातात. मानवी जीवनात प्रत्येक कृतीमागे कार्याचा काही तरी उद्देश अथवा हेतू असतो. साहित्य हे मानवनिर्मित आहे. लेखक का लिहितो? लिहिण्यामागे त्याचा हेतू कोणता असतो? या संदर्भात भारतीय पाश्चात्य साहित्यात सविस्तर विचार मांडले आहेत. भिन्न-भिन्न प्रवृत्तीच्या व्यक्ती आपापल्या अभिरूचीला अनुसरून काव्याचे-साहित्याचे प्रयोजन निश्चित करीत असतात. साहित्य हे ज्ञान देते, शिक्षण देते, मनोरंजन करते, आनंद देते अशी विविध प्रयोजने भारतीय, पाश्चात्य साहित्यामध्ये मांडलेली आहेत. लेखकाच्या दृष्टीने आत्माविष्कार हे साहित्याचे प्रमुख प्रयोजन आहे असे मानले जाते.

**अ) आत्माविष्कार (Self Expression)**

कवी लेखक, कलावंत आपल्या अंत:करणाला प्रतीत झालेल्या सत्याचा, अनुभवाचा कल्पनारम्य आविष्कार करत असतात. पाश्चात्य अभ्यासक डॉ. ब्रॅडले यांनी आत्माविष्कार

हेच कवीचे एकमेव प्रयोजन मानले आहे. आविष्कार या शब्दात कल्पनात्मक नवनिर्मिती (Imaginative Creation) गृहीत धरले आहे. या कविव्यापारातून प्रगट होणारी सृष्टी शुद्ध आनंदमय असेल, अथवा जीवनावर प्रकाश टाकणारी असेल, पण कलावंताचा हेतू स्वत:ला जाणवलेल्या सत्याचा - अनुभवांचा आविष्कार एवढाच असतो. त्याला आपले अंतरंग मोकळे केल्याशिवाय राहवत नाही. 'His business as an artist is to speak out to make a clean breast' (कॉलिंगवुड) ‘माझे मन अनुभवाच्या वर्षावाने इतके भरून येते की अंत:करण मोकळे करण्यासाठी लिहिण्याशिवाय मला गत्यंतरच नसते’ (गॉर्की) विश्वातील अनेकविध घटनांच्या व्यक्तीच्या दर्शनाने कलावंताच्या मन:सृष्टीला विशिष्ट आकार येऊ लागतो. हा आकार येताच आविष्कार अपरिहार्य ठरतो. हा आविष्कार माणसाच्या सर्जनशील प्रवृत्तीमधूनच होतो (Creative Instinct) आपल्या प्रतिभानिर्मित सृष्टीमध्ये कवी जीवनातील अनुभवांना नवा-नवा आकार देत असतो. प्रत्येक कवीचे अनुभवविश्व वैशिष्ट्यपूर्ण असते. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवविश्वातून काही उत्कट अनुभव प्रतिभावित करून प्रगट करणे हेच कलावंताचे एकमेव कार्य आहे; हेच आविष्काराचे प्रयोजन होय. तो दुसऱ्या कोणत्याही हेतूने आपल्या अनुभवांचा आविष्कार करीत नसून आविष्कारातच त्याच्या मूलभूत प्रेरणांचे समाधान होते. लेखकाच्या चित्तवृत्ती अधिक तरल असतात, त्याची संवेदनक्षमता अधिक तीव्र असते, विश्वाचे त्याचे निरीक्षण अधिक सूक्ष्म असते व स्वभावत: तो विचारशील असतो. म्हणूनच त्याला येणाऱ्या अनुभवात काही शाश्वत व इतरांना न जाणवणारा सूक्ष्म अर्थ त्याला तीव्रपणे जाणवतो. आपल्या अनुभवात आनंदाची प्रतीती घेत तो आविष्कार करत असतो. तो आपल्या प्रतिभा किंवा कल्पनाशक्तीच्या साहाय्याने आपल्या अनुभवांना शाश्वत रूप देतो. ही निर्मिती म्हणजे त्याची कलाकृती असते. ही कलाकृती कलावंताच्या आत्म्याचीच निर्मिती वा आविष्कार असते. हा आविष्कार घडवणे हेच लेखकाचे प्रयोजन असते. म्हणूनच लेखकाच्या दृष्टीने आत्मविष्कार हे साहित्याचे प्रमुख प्रयोजन असते. लेखकाकडे असलेली सर्जनशीलता हीच मानवाच्या चिरंतन विकासाची आदिशक्ती आहे. यातूनच कलानिर्मिती होते. आत्मविकाराचा म्हणजेच निर्मितीचा आनंद हेच साहित्याचे मूलभूत प्रयोजन आहे.

रोमँटिसिझच्या पुरस्कर्त्यांनी ‘काव्य म्हणजे आत्माविष्कार’ अशी भूमिका घेतली आहे. यांतील वर्ड्स्वर्थने केलेली व्याख्या सुप्रसिद्ध आहे. काव्य म्हणजे भावनांचा उत्स्फूर्त अविष्कार होय. या भावना पुनरूज्जीवित असतात विशुद्ध असतात. कवीच्या जीवनातील विविध घडामोडीचा अनुभवांचा त्याच्या मनावर खोलवर परिणाम होत असतो, त्या भावनांना एक आकार प्राप्त होत असतो. तोच साहित्यातून अभिव्यक्त होतो.

**ब ) जीवनभाष्य :**

मॅथ्यू अर्नोल्ड या जीवनवादी विचारवंताने काव्य म्हणजे जीवनभाष्य (संसृतिटीका) असे काव्याचे प्रयोजन सांगितले आहे. श्रेष्ठ कलावंताचे जीवनभाष्य म्हणजे उदात्त भावनांचा पुरस्कार. जीवनाच्या अंतरंगावर प्रकाश टाकून जीवनाचे रहस्य उलगडून दाखविण्याचे कार्य श्रेष्ठ साहित्याकडून होत असते. त्यामुळे साहित्याला मूल्ययुक्तता येते. जीवनातील अपूर्णता कवीच्या कल्पनाशक्तीतून परिपूर्ण करण्यासाठी कार्यरत होते. अपूर्ण जीवन तो परिपूर्ण करण्यासाठीच आपली साहित्यसृष्टी निर्माण करतो. तेच प्रस्थापित जीवनावरील भाष्य असते. मर्ढेकरांचे काव्य हे असेच आधुनिक यंत्रयुगीन जीवनावरील भाष्य होय. कवीने

समाजावर समकालावर केलेली विदारक टीका असते. येथेही कवीची प्रेरणा अंतकरणाला प्रतीत झालेले जीवनरहस्य प्रकट करणे हीच असते. मर्ढेकर, करंदीकर, कुसुमाग्रज आदी श्रेष्ठ कवींनी जीवनातील विकलता आपल्या काव्यातून मांडली आहे. मर्ढेकरांनी यंत्रयुगातील मानवाच्या अंतकरणातील मूक वेदना पिंपात मेले ओल्या 'उंदिर', 'फलाटदादा', 'गोंधळलेल्या अन् चिंचोळ्या', 'हाडांचे सापळे हासती' या सारख्या कवितांतून व्यक्त केली आहे. यामधून मर्ढेकरांनी यंत्रयुगातील ओंगळवाण्या आणि भेसूर सत्याचे दर्शन घडविले आहे.

संत साहित्यात संत तुकारामांच्या अभंगातून समकालीन जीवनावर भाष्य करताना दिसून येतात.

**क) सामाजिक बांधिलकी (मार्क्सवादी विचारासह)**

साहित्याच्या प्रयोजनाच्या संदर्भात आधुनिक काळात 'बांधिलकी' हा शब्द 'कमिटमेंट' या शब्दाला पर्यायी म्हणून मराठीत रूढ झाला आहे. 'लिटरेचर ऑफ कमिटमेंट' ही संकल्पना दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमधील साहित्यक्षेत्रातून पुढे आली. ज्यॉ पॉल सार्त्र हा याचा प्रमुख प्रवक्ता मानला जातो. विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळापासून मार्क्सवादाच्या साहित्यावरील प्रभावातून या कल्पनेची मांडणी आधीपासून होऊ लागलेली होती. बांधिलकी म्हणजे एखाद्या जीवनविषय दृष्टिकोणाचा जाणीवपूर्वक स्वीकार करणे. व्यक्तीने एखाद्या जीवनविषयक दृष्टिकोणाशी वचनबद्ध प्रतिबद्ध असणे, ती विशिष्ट गोष्ट आपले कर्तव्यच, जबाबदारीच आहे. ही जाणीव ठेवणे व त्यानुसार प्रत्यक्ष कृती करणे या गोष्टी बांधिलकीच्या कल्पनेत अंतर्भूत आहेत. बांधिलकीची संकल्पना ही साहित्यापुरती मर्यादित नाही. ती एक व्यापक नैतिक संकल्पना आहे.

सार्त्र यांच्या मते लेखकाची बांधिलकी ही लिहिण्याच्या प्रक्रियेत अंतर्भूत असते. त्याच्या मते लेखन करणे म्हणजे कृती करणे. या कृतीचे स्वरूप म्हणजे काहीतरी दाखविणे कशावर तरी प्रकाश टाकणे हे असते. लेखक मानवी जगावर प्रकाश टाकतो कारण त्याला ते बदलायचे असते. लेखक जग बदलण्यासाठी लेखन करीत असल्यामुळे त्याला कोणतीतरी एक निश्चित भूमिका म्हणजेच बांधिलकी पत्करणे आवश्यक आहे. सार्त्रने लेखनकृती ही स्वतच्या स्वातंत्र्या प्रमाणेच वाचकाच्या स्वातंत्र्याचीही जपणूक केली पाहिजे असे म्हटले आहे. स्वातंत्र्य हा साहित्याचा पाया असल्यामुळे साहित्यनिर्मिती ही स्वातंत्र्यावर आधारलेली कृती ठरते.

मार्क्सवादाच्या प्रभावाखाली असणारे विचारवंत साहित्यिक यांच्या मते साहित्यकांनी बांधिलकी स्वीकारली पाहिजे म्हणजेच कोणतीतरी निश्चित अशी सामाजिक राजकीय भूमिका स्वीकारली पाहिजे.एक लेखक म्हणून समाजाविषयी आपली जबाबदारी कोणती याची जाणीव लेखकाला असायला हवी. लेखकाची समाजिक जबाबदारी म्हणजे लेखकाने आपल्या काळातील समाजाचे दर्शन घडवावे सामाजातील प्रश्नांची समस्यांची मांडणी त्याने आपल्या लेखनातून करावी. व्यक्तीगत सुखदुखाचे चित्रण करताना त्याच्या मुलाशी सामाजिक परिस्थिती वा समस्या कशा असतात याचे लेखकांनी दर्शन घडवावे सामाजिक अन्यायाविरूद्ध संघर्ष करणाऱ्या शक्तीची बाजू घ्यावी दंभस्फोटाचे कार्य त्यांनी करावे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याठी लेखकांनी प्रयत्न करावेत इत्यादी अपेक्षा लेखकाच्या बांधिलकीच्या स्वरूपात व्यक्त केल्या आहेत.

मार्क्सवादी विचारसरणीप्रमाणे साहित्यकृती ही केवळ कलावस्तू नसून ती सांस्कृतिक वस्तूही असल्याचे स्पष्ट केले आहे. माणसाचे सामाजिक अस्तित्त्व ही विचारसर्ण मार्क्सवाद महत्त्वाची मानतो. कारण आर्थिक संबंध हा समाजाचा पाया असतो.आर्थिक पाया व वास्तवातीतता यांचे संबंध गतिमान असतात.साहाजिक अर्थिक संबंधाला अशा नैतिक धार्मिक राजकीय विचारप्रणालीची वास्तवातीत रचना उभी राहू शकते. मार्क्सवादी साहित्य प्रामुख्याने समाजशास्त्रचा आधार घेते. एखादी कलाकृती ही साहित्यकृती म्हणून विचारात घेताना तिच्यातील सामाजिक प्रेरणा व त्या प्रेरणांचे परिणाम अशा साहित्यकृतीतून साकार होतात.

मार्क्सवादी बांधिलकी म्हणजे साहित्यातून प्रकट होणारा नैतिक आशय वास्तवाचे भान व त्याचे चित्रण यांना महत्त्व असते. समाज परिवर्तनाला पोषक असा आशय साहित्यकृतीतून व्यक्त होत असेल तर ती साहित्यकृती चांगली मानली जाते. साहित्यातून सामाजिकतेचे दर्शन घडविणे ही लेखकांची बांधिलकी होय.

समाजात शोषणारे आणि शोषले जाणारे असे दोन वर्ग असतात. त्यापैकी साहित्याने शोषले जाणाऱ्यांची बाजू मांडली पाहिजे आणि हे शोषण कसे निपटून काढता येईल या संबंधी समाजमन तयार केले पाहिजे. यासाठी या दोन वर्गातला संघर्ष साहित्यात चितारला पाहिजे.म्हणून वर्गसंघर्ष तीव्र करणारे आणि वर्गहीन समाजव्यवस्थेची स्थापना करणारे साहित्य लिहिणे म्हणजे मार्क्सवादी बांधिलकी होय. मार्क्सने लोककल्याणावर भर दिला असून मानवतावादी दृष्टी स्वीकारलेली आहे. साहित्य हे समाजात आकार घेते म्हणून साहित्याने समाजहिताचा विचार केला पाहिजे. साहित्य हे समाजाशी बांधील असते. लेखकांनी या मार्क्सवादी बांधिलकी म्हणून लेखन करावे असे मार्क्सचे मत आहे.

लालजी पेंडसे, भा.वि.वरेरकर, अनंत काणेकर या मार्क्सवाद्यांनी साहित्याची सामाजिकता महत्त्वाची मानली आहे. त्यांच्या मते साहित्याने प्रगतिपर पुरोगामी क्रांतिप्रवण असावे.मजीवींच्या विकासाला हातभार लावावा त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा द्यावा मिकांच्या जीवनाची त्यांच्या संघर्षाची चित्रे रेखाटावीत.

वसंत बापट, मंगेश पाडगावकर, वसंत डहाके, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, शरदचंद्र मुक्तिबोध आणि विंदा करंदीकर ह्यांच्या कवितेतून भांडवली संस्कृतीने केलेली मानवी मूल्यांची चिरफाड स्पष्ट होते.

## ३.३ कोलरिजचा कल्पनाशक्तीचा सिद्धांत व चमकृतिशक्तीचा सिद्धांत

**अ) प्रथम श्रेणीची कल्पनाशक्ती (Primary Imagination) :** कोलरिजच्या मते प्रथम णीच्या कल्पनाशक्तीमुळे आपल्याला ज्ञान होते. ती आपल्याला बोधना घडवणारी जिवंत शक्ती व यंत्रणा आहे. आपल्या सर्व प्रकारच्या इंद्रियजन्य ज्ञानामध्ये ही कल्पनाशक्ती असते. बोधना घडविण्याचे कार्य ती अजाणतेपणाने, नकळतपणे करत असते. आपला सर्व ज्ञान व्यापार व बोधनेचा व्यापार या कल्पनाशक्तीमुळे चाललेला असतो.

**ब) द्वितीय णीची कल्पनाशक्ती (Secondary Imagination) :** द्वितीय श्रेणीची कल्पनाशक्ती ही निर्मिती करणारी शक्ती आहे. ती प्रथम श्रेणीच्या कल्पनाशक्तीचाच

प्रतिध्वनी असते. ती बुद्धिनिष्ठ इच्छाशक्तीच्या (Conscious Will) बरोबर असते. त्यामुळे तिला इच्छाशक्तीचे मार्गदर्शन मिळते. दोघींच्या कार्यपद्धतीत भेद आहे. दुसरी कल्पनाशक्ती अजाणतेपणाने नव्हे तर जाणीवपूर्वक कार्य करते. ती पुनर्निर्मितीसाठी आपल्यासमोरील सामग्रीचे म्हणजेच प्रथम णीच्या कल्पनाशक्तीने दिलेल्या माहितीचे ती विघटन करते. परंतु जेथे असे विघटन अशक्य असते तेथे ती आपल्या समोरील निर्जीव व जड सामग्रीला अधिकाअधिक एकात्म व सचेतन बनविण्याचा प्रयत्न करते. कल्पनाशक्ती ही सचेतन असते. वस्तू ह्या जड व निर्जीव असतात. कल्पनाशक्ती अशा विविध वस्तूंना एकजीव व सचेतन व एकात्म बनवते.

**क) चमत्कृतिशक्ती (Fancy) :** कोलरिजने चमत्कृतिशक्ती ही आणखी एक शक्ती मानली आहे. त्याच्या मते ही केवळ जड व निर्जीव सामग्रीला एकत्रित करण्याचे कार्य करते. चमत्कृतिशक्ती म्हणजे स्थलकालापासून मुक्त झालेली स्मरणशक्ती होय. सहचारी कल्पनांकडून स्मृतीला जशी सामग्री पुरवली जाते तशीच ती चमत्कृतिशक्तीलाही पुरवली जाते. थोडक्यात चमत्कृतिशक्ती ही जड इंद्रियगम्य अनुभवांना एकत्रीत करणारी अशा अनुभवांच्या मानसिक प्रतिमा बनविणारी अशी ही शक्ती आहे. कोलरिजच्या मते वेड व वात यांत जो भेद आहे तोच कल्पनाशक्ती व चमत्कृतिशक्ती यांत आहे. ज्याला वेड लागले आहे त्याच्या वागण्याबोलण्यात चुकीची असली तरी एक प्रकारची संगती असते. वातामध्ये अशी संगती नसते. वातातील माणूस काहीही भरकटल्यासारखा असंबद्ध बोलत असतो. चमत्कृतिशक्ती ही वातासारखी असते. थोडक्यात द्वितीय श्रेणीची कल्पनाशक्ती संवेदनांचे सेंद्रिय एकत्रीकरण करते तर चमत्कृतिशक्ती संवेदनांचे यांत्रिक एकत्रीकरण करते. उदाहरणार्थ बालकवींची 'औदुंबर', 'फुलराणी' या कविता कल्पनाशक्तीचा आविष्कार आहेत, तर त्यांची 'अरूण' ही कविता चमत्कृतिशक्तीचा आविष्कार आहे. काव्यनिर्मिती ही एक मानसिक स्वरूपाची घटना आहे. कवीच्या मनात काव्यनिर्मितीप्रक्रिया घडत असते. तिचे स्वरूप काय असते हे स्वत: कोलरिज या कवीने स्पष्ट केले आहे.

## ३.४ संदर्भ ग्रंथ


१. साहित्यशास्त्र स्वरूप आणि समस्या वसंत पाटणकर

२. कविता आणि प्रतिमा सुधीर रसाळ

३. पाश्चात्य साहित्यविचार प्रा.भालचंद्र खांडेकर डॉ.लीला गोविलकर

४. सौंदर्यमीमांसा रा.भा.पाटणकर

५. काव्यशास्त्र प्रदीप डॉ.स.रा.गाडगीळ

६. साहित्य विचार संपादक डॉ.दत्तात्रेय पुंडे डॉ.स्नेहल तावरे

७. कवितेचा शोध वसंत पाटणकर प्रश्न

## ३.५ स्वाध्याय

१. कोलरिजच्या कल्पनाशक्तीच्या सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करा.

२. आत्माविष्कार व सामाजिक बांधिलकी ही काव्यप्रयोजने विशद करा.

३. कोलरिजच्या कल्पनाशक्तींच्या सिद्धांतामधील द्वितीयणीची कल्पनाशक्ती आणि चमकृतीशक्ती यांच्या कार्याचे स्वरूप विशद करा.

४. मार्क्सवादी सामाजिक बांधिलकी व आत्माविष्कार ही काव्यप्रयोजने सविस्तर स्पष्ट करा.

५. कोलरिज यांनी मांडलेल्या कल्पनाशक्ती व चमत्कृतीशक्तीचा सिद्धांत स्पष्ट करा.

६. सामाजिक बांधिलकी हे साहित्याचे एक महत्त्वाचे प्रयोजन आहे या विधानाची चर्चा करा.

७. कोलरिजने मांडलेल्या कल्पनाशक्तीच्या प्रकारांची चर्चा करा.

८. मार्क्सवादी विचाराचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट करून सामाजिक बांधिलकी ही कल्पना विशद करा.

**प्रश्न २ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रतीक म्हणजे काय

२. प्रतिमांचे कोणतेही दोन प्रकार लिहा.

३. रूपक म्हणजे काय

४. कोलरिजने कल्पनाशक्तीचे कोणते प्रकार सांगितले

५. कोलरिजच्या मते संवेदनांचे यांत्रिक एकत्रीकरण करणारी शक्ती कोणती

६. व्हिक्टर शक्लोव्हस्की यांनी साहित्य भाषेच्या संदर्भात कोणती संकल्पना मांडली

७. बायोग्राफिया लिटरारिया हा ग्रंथ कोणी लिहिला

८. साहित्य भाषेसंबंधी अपरिचितीकरण ही संकल्पना कोणी मांडली

९. साहित्य हे संसृती टीका असते हा विचार कोणी मांडला

१०. कोलरिजच्या मते साहित्यनिर्मितीच्या मुळाशी कोणत्या प्रकारची कल्पनाशक्ती कार्यरत असते.

११. पंक्चरली जरी रात्र दिव्यांनी हे कशाचे उदाहरण आहे

१२. प्रतिमेचा प्रधान गुणधर्म कोणता

१३. काव्यातील नियमोल्लंघनाचे कोणतेही एक उदाहरण सांगा.

१४. आत्माविष्कार म्हणजे काय

१५. कल्पनांचा स्वैर विलास म्हणजे कोणती शक्ती

१६. सामाजिक बांधिलकी हे प्रयोजन कोणाच्या विचारातून आले आहे

१७. व्याकरणिक नियमांची मोडतोड म्हणजे काय

१८. अनेकार्थतेचा विचार कोणी मांडला आहे

१९. औंदुबर ही कविता कशाचे उदाहरण आहे.

२०. कुट्टपिवळ्या पहाटीआरवतो दैनंदिन भोंगा हे कसले उदाहरण आहे.

❄❄❄❄❄❄❄

# ४

# साहित्य आस्वाद

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.३ साहित्याचा आस्वाद

अ) ॲरिस्टॉटलचा कॅथॅर्सिसचा सिद्धांत

आ) आय. ए. रिचर्ड्सचा प्रेरणासंतुलनाचा सिद्धात

४.४ कॅथॅर्सिसचे विविध अर्थ

१. गिल्बर्ट मरी

२. लेसिंग

३. मिल्टन

४. क्रोचे

५. बुचर

४.५ समारोप

४.६ संदर्भ ग्रंथ

४.७ स्वाध्याय

## ४.० उद्दिष्टे

१. साहित्य निर्मिती प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजून येईल

२. साहित्य व्यापार आणि कला व्यापार यातील फरक समजून येईल .

३. साहित्य आस्वाद प्रक्रिया समजेल

४. कल्पना शक्तीचा परिचय होईल

५. साहित्यात कॅथॅर्सिस म्हणजे काय समजेल

## ४.१ प्रस्तावना

साहित्यव्यापार आणि एकूणच कलाव्यापार यांत निर्मितिप्रक्रियेला जसे महत्त्व असते तसेच ते आस्वादप्रक्रियेलाही महत्त्व असते. कोणताही साहित्यव्यापार-कलाव्यापार हा निर्मितिप्रक्रियेसोबतच आस्वादप्रक्रियेतून पूर्णत्वास जात असतो. साहित्य, कलानिर्मितीसाठी जशी कल्पनाशक्तीची गरज असते तशीच साहित्य, कलास्वादासाठीही कल्पनाशक्तीची आवश्यकता असते. भारतीय साहित्यशास्त्राच्या परंपरेतील राजशेखराच्या मते कलावंत आणि रसिक या दोघांकडेही प्रतिभा असणे आवश्यक आहे. कलावंताकडे असणाऱ्या प्रतिभेला तो 'कारयित्री' प्रतिभा तर रसिकाजवळ असणाऱ्या प्रतिभेला 'भावयित्री' प्रतिभा संबोधतो.

साहित्याच्या आस्वादासंबंधी अशी भूमिका घेतली जाते की आस्वाद म्हणजे दुसरी कलाकृतीच असते. साहित्यकृतीचा अनुभव म्हणजे दुसरी निर्मितीच असते, ही भूमिका खूपच मर्यादित अर्थाने खरी आहे. साहित्य- कलेच्या आपल्या अनुभवात पुनर्रचना होते, हे खरे आहे.परंतु हा अनुभव पुनर्रचित करण्यासाठी लागणाऱ्या क्षमता निर्मितीच्या क्षमतांप्रमाणेच असतात, असे म्हणता येत नाही. लेखकाच्या निर्मितिप्रक्रियेत लेखकाची संश्लेषणाची प्रक्रिया महत्त्वाची असते. वाचनप्रक्रियेत / अनुभवप्रक्रियेत मात्र विश्लेषण व संश्लेषण या दोन्ही प्रक्रिया असतात.

साहित्याचा आस्वाद किंवा अनुभव आपण कसा घेतो? साहित्याचा आपला अनुभव काळात उलगडत जाणारा असतो. वाचनप्रक्रियेत आपण एकेका भागाकडून/ घटकाकडून पुढील भागाकडे/ घटकांकडे जात असतो. उदाहरणार्थ, कवितेच्या एका ओळीनंतर दुसरी ओळ, एका कडव्यानंतर दुसरे कडवे वाचतो. याचा अर्थ असा की वाचनप्रक्रियेत एकेका घटकाकडून पूर्णाकडे असा प्रवास होत असतो. या प्रक्रियेत एकेका घटकाचा अर्थ लावला जातो. तसेच एका घटकाचे दुसऱ्या घटकाशी नाते जोडले जाते. या वेगवेगळ्या घटकांच्या परस्परसंबंधांतून आणि त्यांच्या संपूर्ण साहित्यकृतीशी असलेल्या संबंधातून साहित्यकृतीचा अनुभव सिद्ध होत असतो. म्हणजेच वाचकाच्या मनात त्या साहित्यकृतीची पुनर्रचना होत असते. याचाच अर्थ वाचनप्रक्रियेत विश्लेषणाबरोबरच काही प्रमाणात संश्लेषणही होत असते.

## ४.२ विषय विवेचन

साहित्यकृतीतील वेगवेगळ्या घटकांचे विश्लेषण करण्यासाठी, त्यांचा अर्थ लावण्यासाठी व घटकांचे परस्परसंबंध पाहण्यासाठी बुद्धीची जशी गरज असते तशीच तरल संवेदनक्षमता आणि कल्पनाशक्ती यांचीही गरज असते. वाचकाच्या कल्पनाशक्तीने साहित्यकृतीतील मोकळ्या जागांनाही अर्थवत्ता प्राप्त होते.

पाश्चात्त्य साहित्यशास्त्रीय परंपरेतही 'साहित्यिक-कलावंताप्रमाणेच वाचक- रसिकाकडेही काही गुण, क्षमता असायला हव्यात', याचा विचार झालेला आढळतो. केवळ भाषा अवगत आहे म्हणून साहित्याचा अनुभव, आस्वाद घेता येतो असे नाही. साहित्याचा अनुभव घेण्यासाठी भाषा अवगत असणे ही आवश्यक अट आहे. परंतु ती पुरेशी अट नाही. साहित्यानुभवासाठी, साहित्यास्वादासाठी भाषा चांगल्या प्रकारे आत्मसात केलेली असायला हवी. परंतु त्याखेरीज इतरही काही क्षमता त्याच्याजवळ असणे आवश्यक आहेत. यासंदर्भात

जोनाथन कलर या साहित्यमीमांसकाने सांगितलेली 'साहित्यिक क्षमते'ची संकल्पना लक्षात घ्यावी लागते. कलरने तीन प्रकारच्या संकेतव्यवस्थांचे ज्ञान साहित्यिक क्षमतेसाठी आवश्यक मानले आहे. त्याच्या मते साहित्यास्वादासाठी भाषिक संकेतव्यवस्थेबरोबरच साहित्यिक व सांस्कृतिक संकेतव्यवस्थाही तितक्याच आवश्यक आहेत. या संकेतांचे आपले ज्ञान जितके विस्तृत व सखोल असेल तितका आपला साहित्याचा अनुभव नेमका, अर्थपूर्ण व समृद्ध असेल.

साहित्यास्वाद वा साहित्यानुभव म्हणजे काय आणि त्याचे स्वरूप कशा प्रकारचे आहे, याचा विचार केल्यानंतर साहित्याच्या आस्वादासंदर्भात ॲरिस्टॉटल आणि रिचर्ड्स या पाश्चात्य साहित्यमीमांसकांनी मांडलेल्या उपपत्तीं पाहू. सर्वप्रथम आपण ॲरिस्टॉटलच्या 'कॅथॅर्सिस' आणि नंतर रिचर्ड्सच्या 'प्रेरणासंतुलनाच्या सिद्धांता'ची चर्चा येथे करू.

## ४.३ साहित्याचा आस्वाद

अ) **ॲरिस्टॉटलचा कॅथॅर्सिसचा सिद्धांत :** भारतीय साहित्यशास्त्राच्या परंपरेत साहित्याचा आस्वाद हा 'परब्रह्मस्वरूप' किंवा 'ब्रह्मानंदसहोदर' स्वरूपाचा असतो, असे मानले आहे. परंतु पाश्चात्त्य परंपरेत हे स्वरूप कशा प्रकारचे आहे, याचा येथे विचार करू. *पोएटिक्स* (*काव्यशास्त्र*) या ग्रंथात ॲरिस्टॉटलने शोकात्म नाट्य व काव्याची चर्चा केली आहे. ही चर्चा करताना त्याने कॅथॅर्सिस (Catharsis) या घटकाला- प्रक्रियेला विशेष महत्त्व दिले आहे. कॅथॅर्सिस या संकल्पनेचे विवेचन त्याने *पोएटिक्स*च्या सहाव्या प्रकरणात केले आहे. ॲरिस्टॉटलने कॅथॅर्सिस ही संकल्पना हिपोक्रॅटच्या वैद्यकीय ग्रंथातून घेतली. तो स्वत: ख्यातनाम वैद्याचा मुलगा होता. प्राचीन ग्रीक वैद्यकशास्त्रात मानसिक व्याधींवर सर्रास केला जाणारा उपचारच त्याने कॅथॅर्सिस प्रक्रियेत सांगितला.

'कॅथॅर्सिस' या संज्ञेचा मराठीतील अर्थ विरेचन असा आहे. मूळ वैद्यकशास्त्रातील या संकल्पनेचा रूपकात्मक उपयोग करून ॲरिस्टॉटलने मानवी मनावर शोकात्मिकेच्या आस्वादाने होणाऱ्या परिणामाची चर्चा केलेली आहे. शरीरात काही दु:खद किंवा शारीर क्रियांमध्ये व्यत्यय आणणारा पदार्थ असला, तर तो काढून टाकून त्याची स्वाभाविक क्रिया करून देणे म्हणजेच कॅथॅर्सिस होय. अशा क्रियांचे विरेचन झाले असता म्हणजे तो काढून टाकला असता जे उरते ते साहजिकच शुद्धीकरण होय. या शुद्धीकरणात अर्थातच पहिली व महत्त्वाची कारक गोष्ट म्हणजे विरेचन होय.

ॲरिस्टॉटलने शोकात्मिकेच्या आस्वादासंबंधी जे सूत्र मांडले ते म्हणजे "वाचकाच्या मनात भय (fear) व अनुकंपा (pity) या भावना जागृत करून त्यांना आरोग्यास अनुकूल अशा प्रकारची वाट करून देण्याचे कार्य शोकातिंकेने होते." मुळात भय व करुणा (अनुकंपा) या दोनही मानसिक वृत्ती अथवा भावना मनाला दु:ख देणाऱ्या आहेत. त्यांच्यामुळे मन अस्वस्थ होते. अशा भावनांना वाङ्मयवाचनाने अवसर प्राप्त होतो व त्या या वाचनामध्ये खर्च होतात. या भावनांना योग्य वाट करून देण्याचा सोपा उपाय म्हणजे वाङ्मयवाचन किंवा शोकात्मिकेचा आस्वाद होय. या भावनांना अशी वाट

मिळाली की मन हलके होते. यातून जे काही समाधान मिळते तोच करुणरसाचा परिणाम होय. यालाच ॲरिस्टॉटल कॅथॅर्सिस म्हणतो.

आ) **रिचर्ड्सचा प्रेरणा संतुलनाचा (समधातता) सिद्धांत :** रिचर्ड्सने कलानुभव/कलास्वादाच्या संदर्भात प्रेरणासंतुलनाचा सिद्धांत (equilibrium of impulses) मांडला आहे.यालाच समधाततेचा सिद्धांत असेही म्हणतात. त्याच्या मते लौकिक अनुभव व कलानुभव यांच्यात जातीचा भेद नसतो तर तो संख्यात्मक स्वरूपाचा असतो. हे दोन्ही अनुभव एकाच सामग्रीतून निर्माण होतात. प्रेरणा (impulse) ही त्याच्या विवेचनातील मध्यवर्ती संकल्पना आहे. ही संकल्पना तो सामान्य इच्छा व मज्जासंस्थेतील घडामोडी या अर्थांनी वापरतो. त्याच्या मते आपल्या कोणत्याही प्रेरणेचे समाधान करणारी गोष्ट मूल्ययुक्त असते आणि अर्थातच जिच्यामुळे जास्तीत जास्त व महत्त्वपूर्ण प्रेरणांचे समाधान होते, ती गोष्ट अधिकाधिक मूल्ययुक्त ठरते. परंतु आपल्या नेहमीच्या जीवनात असे जास्तीत जास्त व महत्त्वपूर्ण प्रेरणांचे एकाच वेळी समाधान करणे शक्य नसते. लौकिक जीवनातील प्रेरणांच्या दृष्टीने आपला बहुतेकांचा अनुभव दरिद्री, विस्कळीत असा असतो. तो संख्यात्मकदृष्ट्या समृद्ध, सुरचित नसतो. नेहमीच्या जीवनात अनुभवास न मिळणारा समृद्ध, सुरचित म्हणजेच मूल्ययुक्त अनुभव कलेद्वारा मिळतो. कलेतील अनुभव हा प्रेरणांची विपुलता, विविधता व समृद्धता असलेला अधिक सुरचित व म्हणून अधिक संतुलित असतो. कवीची कल्पनाशक्ती कलाकृतीत अनेकविध प्रेरणांची संतुलित संघटना निर्माण करते. एरव्ही नेहमीच्या व्यवहारात एकमेकांना विरोधी असणाऱ्या भावना - प्रेरणा कलाकृतीत एकत्र येऊन एक स्थिर संतुलन निर्माण करतात. या कलाकृतीचा प्रत्यय घेताना लौकिकाप्रमाणेच प्रेरणाजागृती होत असली तरी प्रत्यक्ष कृती घडत नाही. कारण येथे या अनेकविध प्रेरणांमध्ये अशी संगती निर्माण केली जाते व त्याचे असे व्यवस्थापन होते की कृती घडत नाही.

रिचर्ड्च्या मते कलेमुळे आपल्या भावना- प्रेरणांचे व्यवस्थापन होत असते. शेवटी कोणतीही नीतितत्त्वे जीवन अधिक सुस्थापित करण्याचेच कार्य करीत असतात. त्यामुळे भावना- प्रेरणांचे व्यवस्थापन होणे, हे एक नैतिक मूल्यच आहे. या प्रकारे कलेद्वारा अप्रत्यक्षपणे नैतिक कार्य साधले जाते. अर्थात,कलानुभव हे नीतीचे साधन नव्हे. तो केवळ मूल्ययुक्ततेकडे नेणारा मार्ग नसून तो स्वत:च मूल्ययुक्त असतो. म्हणजेच त्याचे मूल्य साधनात्मक नसून साध्यात्मक आहे. काव्य, साहित्य, कलेमुळे आपण जीवनातील कोणत्याही प्रसंगाला डोळसपणे तोंड देऊ शकतो, हा त्याचा दूरगामी परिणाम रिचर्ड्सला महत्त्वाचा वाटतो. त्याच्या मते काव्य हे आपल्याला अशी जीवनदृष्टी देते की त्यामुळे आपण प्रगल्भ होऊन आपली अनुभवक्षमता वाढते. त्यामुळेच धर्म जेथे अयशस्वी ठरला तेथे काव्य यशस्वी होईल, असे रिचर्ड्सला वाटते.

## ४.४ कॅथॅर्सिसचे विविध अर्थ

गेली कित्येक शतके विचारवंतांनी, तत्त्वचिंतकांनी, इतिहासकारांनी, साहित्यमीमांसकांनी शोकात्म नाट्याचे अंतरंग शोधण्याचा - विशेषत: ॲरिस्टॉटलने प्रतिपादिलेल्या कॅथॅर्सिस या

संकल्पनेचा आपापल्या ज्ञानशाखेच्या आधारे अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कॅथॅर्सिस या संज्ञेचे धार्मिक, नैतिक, वैद्यकीय, मानसशास्त्रीय, सौंदर्यवादी आणि ज्ञानात्मक असे निरनिराळे अर्थ सुचविण्यात आले आहेत. त्यातील काही अर्थ आपण येथे पाहू.

१. **गिल्बर्ट मरी :** गिल्बर्ट मरी याच्या मते ॲरिस्टॉटलला कॅथॅर्सिस या शब्दाने एक धार्मिक किंवा संस्कारशास्त्रीय कल्पना सुचवायची आहे. शोकांतिकेचे मूळ डायोनिसस या देवतेच्या उत्सवात आहे आणि हा उत्सव म्हणजे सामुदायिक पापाचे परिमार्जन करणारे एक सामाजिक प्रायश्चित्त असे. शिवाय सामाजिक अरिष्टाचे निवारण करण्यासाठीच ग्रीक शोकांतिकेचा पहिला प्रयोग रोममध्ये करण्यात आला, असा उल्लेख लिव्हीच्या लिखाणात सापडतो. तेव्हा कॅथॅर्सिसमध्ये प्रायश्चित्ताचा अर्थ सामावलेला आहे, असे मरीचे प्रतिपादन आहे

२. **लेसिंग :** लेसिंग हा जर्मन लेखक विरेचनापेक्षा (Purgation) शुद्धीकरणावर (Purification) अधिक भर देतो. लेसिंगच्या मते कित्येक लोकांच्या मनात भय आणि अनुकंपा या भावना अतिरिक्त तरी असतात किंवा मुळीच नसतात. अगदी क्षुल्लक कारणासाठी रडणारे किंवा अगदी प्रियजनविरह झाला तरी अश्रू न ढाळणारे लोकही असतात. अशा लोकांनी शोकांतिका पाहिल्यास- आस्वाद घेतल्यास त्यांच्या या भावना खर्ची पडतात आणि त्यांच्या एकंदर मनोरचनेत या भावनांना योग्य ते स्थान प्राप्त होते. हीच शुद्धीकरणाची प्रक्रिया होय, असे लेसिंगने स्पष्ट केले आहे.

थोडक्यात, लेसिंग या टीकाकाराने 'कॅथॅर्सिस' या संकल्पनेचा अर्थ भावनांचे शुद्धीकरण (Purification) असा घेतला आहे. शोकांतिकेमुळे भावनांचे विशुद्धीकरण होऊन वाचक- प्रेक्षकांवर इष्ट असा नैतिक संस्कार घडतो, असे या भूमिकेत सांगितलेले असल्यामुळे, ही प्रत्यक्ष नीतिवादी भूमिका ठरते.

३. **मिल्टन:** मिल्टनच्या मते कॅथॅर्सिसची प्रक्रिया ही होमिओपॅथिक पद्धत असते.काट्याने काटा काढावा त्याप्रमाणे शरीरातील आम्ल (आंबटपणा) किंवा क्षार (खारटपणा) अधिक झाल्यास तो काढून टाकण्यास जसा आम्लाचा किंवा क्षाराचा उपयोग करण्यात येतो, तसा उपयोग मनात जड झालेल्या भय आणि अनुकंपा यांना वाट काढून देण्यासाठी वाङ्मयातील त्यांच्या वर्णनाचा होतो. थोडक्यात, मिल्टनच्या मते वाङ्मयाच्या अथवा शोकांतिकेच्या आस्वादाने मनात साचून राहिलेल्या या भावनांनी मनाला जी जडता अथवा बधिरता आलेली असते ती हलकी होऊन मन पुन्हा एकदा मोकळे होते.

४. **क्रोचे :** क्रोचेच्या मते मनुष्य आपल्या मनावर झालेल्या संस्कारांचा विस्तार करून म्हणजे त्यास व्यापक असे स्वरूप देऊन त्यामधून आपली स्वत:ची मुक्तता करून घेतो. त्या संस्कारांचे स्वत:संबंधी असे स्वरूप दूर सारून तो त्यांना स्वत:च्या मनापेक्षा निराळे असे रूप देतो व त्या पद्धतीने सारे मन:संस्कार त्याच्या दृष्टीने आस्वादयोग्य वस्तू बनतात. या प्रक्रियेत तो स्वत:स या संस्कारांपेक्षा वरच्या पदवीवर नेऊ शकतो. हे कार्य म्हणजे माणसास आपल्या वैयक्तिक संस्कारांपासून मुक्त करून त्या संस्कारांस विशुद्ध स्वरूप देण्याचे कार्य, हे कलाप्रवृत्तीचे अंग आहे. या संपूर्ण

प्रक्रियेत जी मानसिक क्रिया होते, त्या क्रियेमुळे मनुष्य निष्क्रियतेपासून मुक्त होतो. यालाच क्रोचेच्या मते कॅ ॅथॅर्सिस म्हणावयाचे.

५. **बुचर :** बुचर या ॲरिस्टॉटलच्या ग्रंथावरील भाष्यकाराने वरील अभ्यासकांच्या मतमतांतरांतून एक सुसंगती लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या मते कॅथॅर्सिस म्हणजे भावनांचे विरेचन (purgation) होय. शोकांतिका पाहताना आपल्याला कोणता अनुभव येतो ? बुचरच्या मते या अनुभवात तादात्म्य आणि साधारणीकरण असे दोन टप्पे आहेत. प्रारंभी वाचक - प्रेक्षकांचे व्यक्तित्व नायकाच्या व्यक्तित्वात तात्पुरते विलीन होते. त्यामुळे त्याला नायकावर आलेली संकटे जणू आपल्यावर आलेल्या संकटासारखी वाटू लागतात.यानंतर साधारणीकरणाचा टप्पा येतो. भावनांची व्यक्तिनिबद्धता गळून पडल्यामुळे सर्व मानवजातीचेच दु:ख आपण वाचत-पाहात आहोत आणि शोकांतिका म्हणजे सर्व मानवी जीवनाचे चित्र आहे असे वाटू लागते. मानवापुढील मूलभूत स्वरूपाचे, प्रचंड असे प्रश्न दिसू लागतात. अशा परिस्थितीत नायकाला दु:ख भोगावे लागणे यात एक नैतिक अपरिहार्यता आहे,असेही लक्षात येते. जीवनाच्या या विराट दर्शनामुळे जी आदरयुक्त भीती (awe) निर्माण होते, तिच्यात भीती व अनुकंपा यांचा मिलाफ झालेला असतो. परंतु त्यांच्यातील व्यक्तिनिबद्धता गळून गेल्यामुळे त्यांतील नेहमीचा दु:खद भागही नाहीसा होतो. अशा रीतीने भावनांचे विरेचन होते. व्यक्तिनिबद्धता ही शोकांतिकेच्या मार्गातील अडथळा आहे. शोकांतिकेच्या आस्वादाने तो दूर होतो. वाचक- प्रेक्षक अप्रत्यक्षरीत्या नैतिकतेला संमुख होतो. कॅथॅर्सिसचे हे दोन्ही अर्थ लक्षात घेतले तर ॲरिस्टॉटल 'शोकात्मिकेचा- साहित्याचा वाचक- प्रेक्षकमनावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नैतिक संस्कार होतो' ही भूमिका घेतो, असा बूचरच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

## ४.५ समारोप

साहित्य आणि मानवी जीवनाचा खूप जवळचा संबंध आहे. साहित्यामुळेच आपणास आपला इतिहास समाजात असतो साहित्य जर मानवी जीवनातून वगळल्यास मानवी जीवनाला काही ही अर्थ उरणार नाही.

म्हणून या प्रकरणात आपण साहित्य निर्मिती प्रक्रिया आणि साहित्य व्यापार या विषयी सविस्तर चर्चा केली आहे. साहित्याचा आस्वाद घेण्यासाठी सुद्धा वाचकांजवळ बौद्धिक प्रगल्भता असणे आवश्यक आहे. साहित्य मुळातच मानवी मनाच्या आंतरिक कल्पना शक्तीच्या जोरावर निर्माण होत असते . साहित्याची निर्मिती ही मानवी आत्माविष्कार असतो. साहित्यातून जे मानवी मन तयार होत असते ते विकसित झाल्याचे आपणास दिसून येत असते. म्हणून साहित्यात कल्पना शक्तीला महत्वाचे स्थान आहे. वेगवेगळ्या साहित्यविचारवंतांनी साहित्य निर्मिती संकल्पना वरील प्रमाणे मांडल्या आहेत.साहित्य आणि कला यातील फरक ही या ठिकाणी सांगितले आहे.

अशा प्रकारे आपणास साहित्य निर्मिती प्रक्रिया समजून घेता येईल.

## ४.६ संदर्भ ग्रंथ


१) करंदीकर, गो. वि. (१९५७) : *ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र* (अनुवाद), मौज प्रकाशन, मुंबई.

२) गणोरकर प्रभा, डहाके वसंत आबाजी आणि इतर (संपा.) (२००१): *वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश*, ग.रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई.

३) गाडगीळ, स. रा. (२०१०): काव्यशास्त्रप्रदीप, व्हीनस प्रकाशन, पुणे.

४) जोग, रा. श्री. (१९८४) : अभिनव काव्यप्रकाश, व्हीनस प्रकाशन, पुणे.

५) नेमाडे भालचंद्र (१९८७) : *साहित्याची भाषा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

६) पाटणकर वसंत (२००६) : *साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या*, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

७) पाटील गंगाधर (१९८१) : *समीक्षेची नवी रूपे*, मॅजेस्टिक, मुंबई.

८) मालशे मिलिंद (१९९५) : *आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धान्त आणि उपयोजन*, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

९) राजाध्यक्ष विजया आणि इतर (संपा.) (२००२) : *मराठी वाङ्मयकोश, खंड- ४, (समीक्षा संज्ञा)*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


## ४.७ स्वाध्याय:

**प्रश्न क्र.१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ॲरिस्टॉटलने 'कॅथॅर्सिस' ही संकल्पना कोणाच्या वैद्यकीय ग्रंथातून घेतली आहे?

२. साहित्याच्या आस्वादात जोनाथन कलरने कोणकोणत्या संकेतव्यवस्थांचे ज्ञान असणे आवश्यक मानले आहे ?

३. शोकांतिकेचे मूळ कोणत्या देवतेच्या उत्सवात आहे ?

४. लेसिंगने 'कॅथॅर्सिस' या संकल्पनेचा कोणता अर्थ सांगितला आहे ?

५. मिल्टनने 'कॅथॅर्सिस' या संकल्पनेचा अर्थ लावताना कोणत्या वैद्यकीय पद्धतीचा आधार घेतला आहे ?

६. प्रेरणासंतुलनाच्या सिद्धांताला आणखी कोणत्या नावाने ओळखले जाते ?

७. लौकिक अनुभव व दैनंदिन अनुभव यात कोणत्या स्वरूपाचा भेद असतो?

८. कोणती शक्ती कलाकृतीत अनेकविध प्रेरणांची संतुलित संघटना निर्माण करते?

९. रिचर्ड्च्या मते कलेमुळे आपल्या भावना- प्रेरणांचे काय होत असते?

१०. बुचरच्या मते साहित्याच्या आस्वादात कोणते दोन टप्पे असतात?

**प्रश्न क्र. २. खालील विषयांवर टीपा लिहा.**

१. मिल्टनकृत 'कॅथॅर्सिस' संकल्पनेचे विवेचन

२. बुचरकृत 'कॅथॅर्सिस' संकल्पनेचे विवेचन

३. लौकिक अनुभव व कलानुभवातील भेद

४. साहित्याच्या आस्वादप्रक्रियेतील प्रेरणासंतुलनाच्या व्यवस्थापनाचे महत्त्व

**प्रश्न क्र. ३. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. साहित्याच्या आस्वादप्रक्रियेतील कॅथॅर्सिस या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करा.

२. ॲरिस्टॉटलकृत 'कॅथॅर्सिस' ही संकल्पना विशद करून विविध अभ्यासकांनी लावलेल्या अर्थांचा परामर्श घ्या.

३. साहित्याच्या आस्वादप्रक्रियेतील रिचर्ड्सच्या प्रेरणासंतुलनाच्या सिद्धांताचे महत्त्व स्पष्ट करा.

४. साहित्याचा आस्वाद म्हणजे काय ते सांगून या आस्वादप्रक्रियेतील प्रेरणासंतुलनाचे कार्य विशद करा.

❄❄❄❄❄❄❄